पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी




## स्वदेशी हा जीवनमंत्र करा

मुंबई • वर्ष: 7 • अंक: 17 • 1 सप्टेंबर 2025 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.




# आमचा देवाभाऊ







## अध्यक्षीय मनोगत

# आमचा देवाभाऊ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कार्यकाळात तसेच गेल्या ३ वर्षात उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्रीपदाच्या दुसऱ्या कार्यकाळात महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेतले. मोदी सरकारच्या महिला केंद्रीत धोरणाची अंमलबजावणी करण्याबरोबरच देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारच्या महिला कल्याणाच्या अनेक योजना सुरू केल्या. या योजनांचा लाभ राज्यातील कोट्यवधी महिलांना होत आहे. फडणवीस सरकारच्या या योजनांमुळे सामान्य कुटुंबातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा मार्ग उपलब्ध झाला. माझी लाडकी बहीण योजना, अन्नपूर्णा योजना, महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत, लेक लाडकी योजना, युवा प्रशिक्षण योजना, मुलींसाठी मोफत उच्च शिक्षण योजना, ई-रिक्षा खरेदीसाठी कर्ज अशा एक ना अनेक योजना सध्या सुरू आहेत.

महिलांना स्वयंपूर्ण बनविणाऱ्या या योजनांबद्दल राज्यातील समस्त महिला वर्गातर्फे कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ‘आमचा देवाभाऊ’ कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. पक्षाच्या राज्यभरातील महिला कार्यकर्त्यांनी तसेच सर्वसामान्य महिलांनी श्री. फडणवीस यांना राखी पाठवावी, या राखीबरोबर श्री. फडणवीस यांच्याबद्दलच्या भावना मोजक्या शब्दात व्यक्त कराव्यात, अशी या कार्यक्रमामागची कल्पना होती. नियोजनाप्रमाणे हा कार्यक्रम षण्मुखानंद सभागृहात अत्यंत देखण्या स्वरूपात पार पडला. राज्याच्या काना-कोपऱ्यातून सर्व सामान्य महिला कार्यकर्त्या या कार्यक्रमासाठी आल्या होत्या. महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष जयश्री अहिरराव यांनी या अभियानाच्या प्रभारी व प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष आ. चित्राताई वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नेटके आयोजन केले होते. या कार्यक्रमात देवेंद्रजींनी महिला शक्तीच्या आशीर्वादामुळे आपण पुन्हा मुख्यमंत्री बनलो, असे आवर्जुन सांगितले. महिला कल्याणाची एकही योजना आपले सरकार बंद करणार नाही, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या कार्यक्रमात दिली. महिला कार्यकर्त्यांनी राखीबरोबर देवेंद्रजींबद्दल व्यक्त केलेल्या भावना हृद्य आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सक्षम महिला शक्तीचे दर्शन घडले. या कार्यक्रमाचे उत्तम आयोजन केल्याबद्दल सर्व संबंधितांचे अभिनंदन.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात स्वदेशीचा जागर करण्याचे आवाहन देशाला केले होते. अमेरिकेने भारतावर लादलेले आयात शुल्क अलिकडेच लागू झाले. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी देशातील जनतेला ‘स्वदेशी हा जीवनमंत्र’ बनवण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधानांचे हे भाषण कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आवर्जुन वाचावे. याचबरोबर या अंकात देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना, उपमुख्यमंत्री असताना मराठा समाजासाठी घेतलेल्या निर्णयांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. राज्यात अनेक वर्षे काँग्रेसची सत्ता होती. असे असतानाही मराठा समाजाच्या विकासासाठी काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनी एक कवडीदेखील दिली नाही. श्री. फडणवीस यांनी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची पुनर्स्थापना करता मराठा समाजातून उद्योजक तयार करण्याचा निर्णय घेतला. या महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी महामंडळाच्या माध्यमातून १ लाख मराठा उद्योजक घडवण्याचा निर्धार प्रत्यक्षात आणला आहे. याबाबतची माहितीही आपण जाणून घेऊन समाजापुढे अभिमानाने सांगितली पाहिजे.

**रवींद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर–वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे


पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

लाडक्या बहिणींच्या आशीर्वादामुळेच पुन्हा मुख्यमंत्री बनलो ०४



स्वदेशी हा जीवनमंत्र करा ०८



संकट नव्हे संधी ११



प्रस्तावित जीएसटी सुधारणा : विकासाच्या नव्या टप्प्याची सुरुवात १३




युवराज- राजकारणातला 'स्क्रोल' १६



खोटा प्रचार करणा-यांना आणखी एक सणसणीत चपराक १९



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई –२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२–२२०२२०५०

# लाडक्या बहिणींच्या आशीर्वादामुळेच पुन्हा मुख्यमंत्री बनलो




आजचा कार्यक्रम हा अतिशय सुंदर आणि भावनिक आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर रक्षाबंधनाचा कार्यक्रम राबवण्यात आला असून आतापर्यंत ३६ लाख ७८ हजार बहिणींची राखी माझ्यापर्यंत पोहोचली आहे. काहींनी पत्राद्वारे त्यांच्या भावना पोहोचवल्या आहेत. या तमाम बहिणींची राखी आणि त्यांचे प्रेम मी स्विकारतो. जन्मभर मला या प्रेमातच राहायचे आहे. या प्रत्येक राखीमध्ये केवळ प्रेम आहे. आपल्या संस्कृतीमध्ये प्रत्येक नाते महत्वाचे असून प्रत्येक नात्याचा उत्सव आहे. आम्ही नाती निभावणारे लोक आहोत. आम्ही परिवार, कुटुंब मानणारी लोकं आहोत. खूप लोकांनी खूप प्रयत्न करून बघितले पण कुठल्याही शस्त्रापेक्षा आणि अस्त्रापेक्षा प्रेमाचे आशीर्वाद हे अधिक ताकदवान असतात. त्यामुळे आज सर्वांच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा महाराष्ट्रात आपली सेवा करण्यासाठी मला मुख्यमंत्रीपदाची संधी मिळाली. आमच्या लाडक्या बहिणी याच्या शिल्पकार आहेत.






### नारी शक्तीला कुणीही थांबवू शकत नाही

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाच्या विकासाचे स्वप्न बघितले. हे विकासाचे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर, जोपर्यंत लोकसंख्येचा ५० टक्के हिस्सा या स्वप्नाचा भाग होत नाही तोपर्यंत हे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे महिला केंद्रीत योजनांच्या माध्यमातून मोदीजींनी विकास सुरु केला. महिलाकेंद्रित विकास हे मॉडेल त्यांनी देशात सुरु केले. 'बेटी बचाव, बेटी पढाओ'पासून सुरु झालेला हा प्रवास आता 'लखपती दीदी'पर्यंत पोहोचला आहे. 'ऑपरेशन सिंदूर' सुरु असताना आमच्या दोन भगिनी टीव्हीवर आपल्या सैन्याचा पराक्रम आणि भारताची दैदिप्यमान कामगिरी आमच्यापुढे मांडायच्या. हा मोदीजींनी तयार केलेला नवा भारत आहे. या भारतात आमची भगिनी घरात बसणार नसून समान भागिदारीने देशाच्या विकासात सहभागी होणार आहेत, हे आपल्या लक्षात आले. २०२९ मध्ये मोदीजींनी देशाच्या संसदेत आणि विधानसभेत आमच्या भगिनींना भागिदारी दिलेली आहे. त्यामुळे आता आमच्या भगिनी थांबणार नाहीत. आमच्या नारी शक्तीला








देशात कुणीही थांबवू शकत नाही.

### 'लखपती दीदी' कार्यक्रमात महाराष्ट्र देशात प्रथम!

लखपती दीदींसाठी देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत. मोदीजींनी ज्यावेळेस 'लखपती दीदी' हा कार्यक्रम जाहीर केला तेव्हा अनेकांना प्रश्न पडला लखपती दीदी म्हणजे काय? मोदींजी सांगितले जी महिला स्वत:च्या भरोशावर दरवर्षी वर्षाला एक लाख रूपयांपेक्षा जास्त पैसा कमवेल ती लखपती दीदी म्हणता येईल. त्याकरीता वेगवेगळ्या योजना मोदीजींनी सुरू केल्या. आज सांगताना आनंद वाटतो, लखपती दीदीच्या कार्यक्रमात देशात पहिल्या नंबरवर आपला महाराष्ट्र आहे. मागील वर्षी २५ लाख बहीणी लखपती दीदी झाल्या आहेत, यावर्षी अजून २५ लाख भगिनी लखपती दीदी होणार आहेत. माझ्या १ कोटी बहीणींना लखपती दीदी केल्याशिवाय आम्ही थांबणार नाही हा निर्णय केला आहे.

### पाच वर्ष आपली एकही योजना बंद होऊ देणार नाही

लाडकी बहिणसारखी योजना आम्ही सुरु केली. आपल्याला महिलांना सक्षम करायचे आहे. एक महिला कमावती झाली तर ती संपूर्ण परिवाराचे कल्याण करते. महिला सहकारी संस्थांना समर्पित काम मिळालेच पाहिजे यादृष्टीने आम्ही निर्णय घेणार आहोत. महाराष्ट्रात निघणाऱ्या कामांमध्ये महिला संस्थांची हिस्सेदारी आणि हक्क







प्रस्थापित करण्याचा निर्णय येत्या काळात घेऊ. त्यातून महिलांना उद्योग, व्यापार आणि व्यवसायात मोठे करण्याचे काम होणार आहे. अनेकजण निवडणूक संपल्यावर योजना बंद होतील असे म्हणत होते. परंतु, पाच वर्षे आपली एकही योजना आम्ही बंद होऊ देणार नाही. पाच वर्षाने तुमच्या आशीर्वादाने पुन्हा सरकार आले तर पुढची पाच वर्षे या योजना असतील. २०२९ मध्ये तर तुम्हीच सत्तेत येणार आहात. त्यामुळे आमचे काहीही चालणार नाही. आतापर्यंत तुम्ही घरच्या गृहमंत्री म्हणून हुकूम चालवत होत्या. २०२९ नंतर मोदीजींनी तुम्हाला राज्याच्या मंत्री म्हणून हुकूम चालवण्याची संधी दिली आहे. यामुळे राज्यात गुणात्मक परिवर्तन होणार आहे.

### बिहारमध्येही महाराष्ट्रासारखीच अवस्था होणार

तुमच्या आशीर्वादाने आम्हाला अभूतपूर्व यश मिळाले. या यशाने तुम्ही आनंदी आहात, पण काही लोकांचे अजूनही समाधान झालेले नाही. ते तोंडावर पडले, मातीत मिळाले तरी सुधारण्यास तयार नाहीत. रोज वोटचोरी झाली असे म्हणतात. पण, यांचे डोके चोरी झाले आहे. त्यांना सुबुद्धी, अक्कल येवो असा २५ टक्के आशीर्वाद त्यांच्यासाठीही मागा. लाडक्या बहिणींच्या मताला ते चोरी म्हणत असतील तर त्यांच्यापेक्षा मोठे चोर कुणीच नाही. कालपर्यंत ते परदेशात जाऊन भारताची बदनामी करत होते. आता बिहारमध्ये जाऊन महाराष्ट्राची बदनामी करत आहेत. पण त्यांची महाराष्ट्रात जी परिस्थिती झाली तीच अवस्था बिहारमध्ये सुद्धा होणार आहे. देशाचा आणि आत्मनिर्भर भारताचा विचार करणाऱ्या मोदींसारख्या नेत्याच्या पाठीशी सर्व मातृशक्ती उभी आहे. मोदीजीच येणाऱ्या पिढीचे कल्याण करणार, असा सर्वांना विश्वास आहे. आम्ही नेहमी तुमची मान अभिमानाने उंच राहील असेच काम करु. आम्ही आमच्या स्वार्थासाठी नाही तर समाजाच्या, महाराष्ट्राच्या स्वार्थासाठी काम करू. तुमचा आशीर्वाद मिळाला की सुसाट सुटतो आणि महाराष्ट्राला परिवर्तित करुन दाखवतो. ■

# स्वदेशी हा जीवनमंत्र करा




अहमदाबादजवळील हंसलपूर येथे मारुती सुझुकीच्या 'ई-विटारा' या पहिल्या इलेक्ट्रिक कारचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. 'स्वदेशी हा आपला जीवनमंत्र व्हायला हवा. चला अभिमानाने स्वदेशी स्वीकारूया', असे आवाहन पंतप्रधानांनी यावेळी केलेल्या भाषणात केले. श्री.मोदी यांनी केलेल्या भाषणाचा संपादित अंश.

'**स्वदेशीची** माझी व्याख्या अगदी सोपी आहे. उत्पादनात गुंतवणूक कुणाची आहे, ती डॉलरमध्ये आहे की पौंडात, किंवा या चलनाचे स्रोत काय आहे हे माझ्यासाठी महत्त्वाचे नाही. मात्र, त्या पैशातून जे उत्पादन तयार होईल, त्यात माझ्या देशवासीयांचे श्रम आणि माझ्या देशाच्या मातीचा सुगंध असावा. 'माझ्या व्याख्येनुरूप मारुती सुझुकी ही एक स्वदेशी कंपनी आहे. जपानकडून येथे उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तूदेखील स्वदेशी आहेत. जग आता भारतात तयार होणाऱ्या इलेक्ट्रिक कार चालवेल.'

गुजरातचे मुख्यमंत्री असताना २०१२मध्ये आपणच मारुती सुझुकीला हंसलपूरमध्ये जमीन दिली होती. 'त्या काळातही माझ्या हृदयात 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारता'चे स्वप्न होते. आज 'मेक इन इंडिया'साठी एक महत्त्वाचा दिवस आहे. कारण देशात तयार केलेली ई–वाहने आजपासून १०० देशांमध्ये निर्यात केली जातील. हंसलपूरमधील टीडीएस लिथियम आयन बॅटरी गुजरात प्रायव्हेट लिमिटेड (टीडीएसजी) या कंपनीत लिथियम आयन बॅटरी सेल आणि इलेक्ट्रोडचे उत्पादन होत आहे. 'काही वर्षांपूर्वी भारत अशा बॅटरीसाठी पूर्णपणे अन्य देशांवर अवलंबून होता. 'मागील दशकभरात भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात ५०० टक्के, मोबाइल उत्पादनात दोन हजार ७०० टक्के आणि संरक्षण उत्पादनात २०० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

भारताकडे लोकशाहीची ताकद आहे, तसेच लोकसंख्या मोठी अल्याचा लाभ आहे. आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर कौशल्यपूर्ण कामगार वर्ग आहे. त्यामुळे भारतासोबतची






## 'मिशन मॅन्युफॅक्चरिंग'वर भर!




'भारताची घोडदौड इथेच थांबणार नाही. ज्या क्षेत्रांमध्ये आम्ही चांगली कामगिरी केली आहे, तिथे आणखी चांगली काम करण्याचे आमचे ध्येय आहे. म्हणूनच आम्ही 'मिशन मॅन्युफॅक्चरिंग' वर भर देत आहोत. येत्या काळात आमचे लक्ष भविष्यकालीन उद्योगांवर असेल. भारत सेमीकंडक्टर क्षेत्रात उत्तम प्रगती करत आहे भारत इथे थांबणारा नाही. ज्या क्षेत्रांत आपण उत्तम कामगिरी केली आहे, त्यात अजूनही चांगले करण्याची गरज आहे. यासाठी आपण उत्पादन क्षेत्रावर मोहिमेप्रमाणे भर देत आहोत. आगामी काळात आपला भर भविष्यकालीन उद्योगांवर असेल. अर्धसंवाहक (सेमीकंडक्टर) क्षेत्रात भारत उड्डाण घेत आहे. देशात यासाठी ६ विशिष्ट कारखाने उभारले जात आहेत. आपल्याला अर्धसंवाहक उत्पादन आणखी पुढे न्यायचे आहे. भारत सरकार वाहन उद्योगासाठी दुर्मिळ धातूंच्या कमतरतेशी निगडित अडचणींबाबतही सजग आहे. या दिशेने देशाची क्षमता वाढविण्यासाठी आपण राष्ट्रीय महत्त्वपूर्ण खनिज अभियान (एनसीएमएम) सुरू केले आहे. त्याअंतर्गत देशभरात १,२०० पेक्षा जास्त शोधमोहीमा राबवल्या जातील व महत्त्वपूर्ण खनिजे शोधली जातील. भारत आणि जपान यांचे नाते हे केवळ राजकीय संबंधांपुरते मर्यादित नसून ते सांस्कृतिक आणि विश्वासाचे नाते आहे. आपण एकमेकांच्या प्रगतीत स्वतःची प्रगती पाहतो. मारुती सुजुकीसोबत आपण जी यात्रा सुरू केली, ती आता बुलेट ट्रेनच्या गतीपर्यंत पोहोचली आहे.

**स्वदेशी उत्पादनांमध्ये देशवासीयांचे श्रम, देशाच्या मातीचा सुगंध असावा. 'आत्मनिर्भर भारता'साठी मी आज देशवासीयांना आमंत्रित करतो. २०४७ पर्यंत भावी पिढ्यांना अभिमान वाटेल, असा भारत घडवू.**

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

भागीदारी ही प्रत्येक भागीदारासाठी दोन्ही पक्षांसाठी लाभदायी ठरते. आपण पाहताय, सुजुकी जपान भारतात उत्पादन करीत आहे आणि ज्या गाड्यांचे उत्पादन करीत आहे, त्यांची पुन्हा जपानला निर्यात होत आहेत. हे केवळ भारत-जपान यांच्यातील संबंध बळकट करत नाहीत, तर जागतिक कंपन्यांचा भारतावर असलेला विश्वासही अधोरेखित करते. एक प्रकारे, मारुती सुजुकीसारख्या कंपन्या 'मेक इन इंडिया'च्या ब्रँड ॲम्बेसेडर ठरत आहेत. सलग ४ वर्षे मारुती भारतातील सर्वात मोठी वाहन निर्यातदार कंपनी ठरली आहे. आता आजपासून इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही) निर्यातीला देखील त्याच




प्रमाणावर प्रारंभ होत आहे. आता जगातील डझनभर देशांमध्ये जी इलेक्ट्रिक वाहने धावतील, त्यावर मेड इन इंडिया लिहिलेले असेल.

आपल्या सर्वांना माहित आहे की, इलेक्ट्रीक वाहनांचा पर्यावरणीय व्यवस्थेतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे बॅटरी आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत भारतात बॅटऱ्या पूर्णपणे आयात केल्या जात होत्या. ईव्ही उत्पादनाला गती देण्यासाठी भारताने स्वतः बॅटरी उत्पादन करणे आवश्यक होते. याच दृष्टीकोनातून २०१७ मध्ये येथे (TDSG) टीडीएसजी बॅटरी प्रकल्पाची पायाभरणी केली. आता टीडीएसजीच्या नव्या उपक्रमाअंतर्गत, तीन जपानी कंपन्या एकत्रितपणे भारतात प्रथमच बॅटरी सेल उत्पादन करणार आहेत. बॅटरी सेल्सचे इलेक्ट्रोड देखील स्थानिक पातळीवर तयार केले जातील. या स्थानिकीकरणामुळे भारताच्या आत्मनिर्भरतेला नवी ताकद मिळेल. हायब्रिड इलेक्ट्रिक वाहन व्यवसायाला यामुळे आणखी गती मिळेल. या ऐतिहासिक उपक्रमासाठी मी आपणा सर्वांना अनेक-अनेक शुभेच्छा देतो. काही वर्षांपूर्वीपर्यंत इलेक्ट्रीक वाहनांकडे केवळ एक नवीन पर्याय म्हणून पाहिले जात होते. परंतु माझा नेहमीच असा विश्वास राहिला आहे की, इलेक्ट्रीक वाहन अडचणींवर एक ठोस उपाय आहे. म्हणूनच गेल्या वर्षी सिंगापूर भेटीदरम्यान मी म्हटले होते की, आपण आपल्या जुन्या गाड्यांना, जुन्या रुग्णवाहिकांना हायब्रिड ईव्हीमध्ये रूपांतरित करू शकतो. मारुती सुजुकीने ही आव्हानात्मक जबाबदारी स्वीकारली आणि अवघ्या सहा महिन्यांत एक कार्यरत प्रोटोटाइप तयार केला. आत्ता मी त्या हायब्रिड रुग्णवाहिकेचा प्रोटोटाइप प्रत्यक्ष पाहिला आहे. या हायब्रिड रुग्णवाहिका पीएम ई-ड्राईव्ह योजनेत पूर्णतः बसतात. सुमारे ११ हजार कोटी रुपयांच्या या योजनेत ई-रुग्णवाहिकांसाठी स्वतंत्र बजेट निश्चित केले गेले आहे. हायब्रिड ईव्हीमुळे प्रदूषण कमी होईल आणि जुन्या वाहनांचे रूपांतर करण्याचा पर्याय देखील उपलब्ध होईल. अनेक मोठ्या सुधारणा करून आपण गुंतवणूकदारांसमोरील जुन्या अडचणी दूर केल्या आहेत. त्यामुळे भारतीय उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक करणे गुंतवणूकदारांसाठी सोपे झाले आहे. त्याचे परिणाम आपल्या समोर आहेत. याच दशकात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात जवळपास ५०० टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०१४ च्या तुलनेत मोबाईल फोन उत्पादनात तब्बल २,७०० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रातही गेल्या दशकात २०० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. हे यश आज भारतातील सर्व राज्यांना प्रोत्साहित करीत आहे. सुधारणा आणि गुंतवणुकीबाबत राज्यांमध्ये निरोगी स्पर्धा सुरू झाली आहे, ज्याचा संपूर्ण देशाला लाभ होत आहे. स्वच्छ ऊर्जा आणि स्वच्छ वाहतूक हेच आपले भविष्य आहे. अशा प्रयत्नांमुळे भारत वेगाने स्वच्छ ऊर्जा आणि स्वच्छ वाहतुकीचे एक विश्वासार्ह केंद्र म्हणून उदयास येईल. ■

# संकट नव्हे संधी

> भारतावरील आयात शुल्क वाढीचा अमेरिकेचा निर्णय अंमलात आला आहे. ट्रम्प प्रशासनाने आयात शुल्क वाढीबाबत अनेक इशारे देऊनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासंदर्भात ट्रम्प प्रशासनाला उत्तर देण्याची तसदीही घेतली नाही. पंतप्रधानांनी गेल्या काही दिवसापासून 'आत्मनिर्भर भारता'साठी स्वदेशीचा मंत्र आचारणात आणा, असे विविध व्यासपीठांवरून सातत्याने सांगितले आहे. याचा अर्थ ट्रम्प प्रशासनाच्या दबाबतंत्राला मोदी सरकार कृतीने उत्तर देत आहे.

**ट्रम्प** प्रशासनाने आयात शुल्क वाढीचा निर्णय जाहीर केल्यानंतर त्याच्या आधारे मोदी सरकारच्या परराष्ट्र नितीवर अनेक विद्वान मंडळींनी नेहमीप्रमाणे बेताल टीका सुरू केली होती. ही बेताल टीका करण्यापूर्वी भारत आणि अमेरिकेतील व्यापार संबंधाची पार्श्वभूमी या मंडळींनी लक्षात घेतली नव्हती. तशी निकड त्यांना वाटत नाही. अमेरिकेसारख्या महाशक्तीला भारत रशियाकडून किती कच्चे तेल घेतो आणि जगात किती विकतो याचे प्रत्यक्षात देणेघेणे नाही. भारत आणि रशियातील कच्चे तेल खरेदी-विक्री व्यवहाराचे निमित्त ट्रम्प प्रशासनाने केले आहे. ट्रम्प प्रशासनाचे खरे लक्ष्य भारतातील शेती आणि शेतीपूरक व्यवसाय आहे. हे क्षेत्र व्यापारासाठी खुले करण्याची अमेरिकेची मागणी मोदी सरकारने ठामपणे नाकारली. ट्रम्प प्रशासनाचा दबाव झुगारून मोदी सरकार आपल्या निर्णयावर ठाम राहिले. जपानसारख्या देशाने अमेरिकेपुढे झुकून आपले कृषी क्षेत्र व्यापारासाठी खुले केले. एवढेच



नव्हे तर अमेरिकेतून आयात होणाऱ्या शेतीमालावर शून्य टक्के आयात शुल्क असेल, असा निर्णय जपानने घेतला. जपानबरोबरच व्हिएतनामनेही अमेरिकेच्या दबावापुढे झुकत कृषी क्षेत्र व्यापारासाठी खुले केले. जपान आणि व्हिएतनामने शेती क्षेत्राबरोबर दुग्ध उत्पादने, मासे यावरीलही आयात शुल्क शून्यावर आणले. भारताने मात्र ट्रम्प प्रशासनाच्या दबावतंत्राला भीक घातली नाही. भारतीय शेतकऱ्यांच्या हिताशी आपण कधीच तडजोड करणार नाही, असे ठामपणे सांगणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या निर्धारापासून ढळले नाहीत.

भारत आणि अमेरिकेतील व्यापार १२५ अब्ज डॉलर्स एवढा आहे. भारतीय रुपयात याची किंमत ११ लाख कोटी एवढी आहे. भारताची अमेरिकेला होणारी निर्यात ७ लाख ४८ हजार कोटी (८५ अब्ज डॉलर्स) एवढी आहे. तर अमेरिकेतून भारतात होणारी निर्यात ३ लाख ५२ हजार कोटी रुपये (४० अब्ज डॉलर्स) एवढी आहे. भारताबरोबच्या वयापारामध्ये अमेरिकेला ४५ अब्ज डॉलर्स एवढी तूट होत आहे, असा याचा अर्थ आहे. ही व्यापार तूट भरून काढण्यासाठी अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क वाढविण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन ट्रम्प प्रशासनाने ३०० अब्ज डॉलर्स एवढा महसूल अन्य देशाच्या बरोबरच्या व्यापारातून कमवण्याचे ध्येय ठेवले आहे. ट्रम्प प्रशासनाने भारतावर



लावलेल्या २५ टक्के अतिरिक्त आयात शुल्कामुळे भारतावर मोठा विपरीत परिणाम होणार, असे चित्र काही मंडळी जाणीवपूर्वक रंगवित आहेत. भारताच्या एकूण सकल उत्पादनामध्ये (जीडीपी) निर्यातीचा वाटा २० टक्के आहे. भारतातून अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत हिरे, जड जवाहीर, औषधे, औद्योगिक उत्पादने, वाहनांचे सुटे भाग यांचा मोठा वाटा आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा आकार लक्षात घेतला तर २५ टक्के अतिरिक्त आयात शुल्क आकारणीच्या ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाचा भारतावर फार मोठा परिणाम होईल, असे दिसत नाही. ट्रम्प प्रशासनाने भारतावर आयात शुल्क लादण्यापूर्वी भारताने ब्रिटन, संयुक्त अरब अमिराती (यूएई) यासारख्या १३ देशांशी मुक्त व्यापार करार (फ्री ट्रेड ॲग्रीमेंट) केला आहे. अमेरिकेला पर्याय म्हणून भारताला अन्य देशांची बाजारपेठ उपलब्ध आहे. ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, संयुक्त अरब अमरात यासारख्या १३ देशांची मुक्त व्यापार करार असल्यामुळे हिरे, मौल्यवान रत्ने, वाहनांचे सुटे भाग यासारख्या वस्तूंच्या निर्यातीला पर्यायी बाजारपेठ उपलब्ध आहे. त्यामुळेच अमेरिकेने अतिरिक्त २५ टक्के आयात शुल्क लावले म्हणजे भारतावर अरिष्ट कोसळले, असे मानण्याचे कारण नाही. ट्रम्प प्रशासनाचा भारतावर रशियाकडून कच्चे तेल आयात केल्यामुळे राग असल्याचा गैरसमज डोक्यातून काढून टाकला पाहिजे. अतिरिक्त २५ टक्के आयात शुल्क लावणाताही ट्रम्प प्रशासनाने भारतातून निर्यात होणाऱ्या पेट्रोलियम पदार्थांवर शून्य टक्के आयात शुल्क ठेवले आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे. भारत रशियाकडून आयात केलेल्या कच्च्या तेलापासूनच पेट्रोलियम पदार्थ बनवतो. तरीही अशा पदार्थांवर शून्य टक्के आयात शुल्क ठेवणाऱ्या ट्रम्प प्रशासनाचा छुपा हेतू वेगळाच आहे, हे स्पष्ट होते. भारतातून कापड, मसाले, बासमती तांदूळ, आंबा, केळी, मोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने आदींची अमेरिकेला निर्यात करतो. ट्रम्प प्रशासनाने भारतातून निर्यात होणाऱ्या औषधे, मोबाईल, वाहन्यांचे सूटे भाग, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने आणि पेट्रोलियम पदार्थ यावर कोणतेही अतिरिक्त शुल्क लावलेले नाही. वाढीव आयात शुल्क लादण्याचा ट्रम्प प्रशासनाचा निर्णय अमेरिकेतील ज्येष्ठ पत्रकारांनाही, विश्लेषकांनाही रूचलेला नाही. ट्रम्प प्रशासनाची ही धोरणात्मक घोडचूक आहे, अशा शब्दात अनेक ज्येष्ठ पत्रकारांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे. भारताच्या एकूण निर्यातीपैकी १० टक्के निर्यात अमेरिकेला होते. अमेरिका वगळता अन्य जगाची बाजारपेठ भारताला खुली आहे. त्यामुळेच ट्रम्प प्रशासनाने अनेक इशारे देऊनही भारत आपल्या भूमिकेवर ठाम राहिला. संकटाचे संधीत रूपांतर करण्याची हीच योग्य वेळ आहे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी जाणून आहेत. १९९८ मध्ये पोखरण अनुचाचणीनंतर भारतावर त्यावेळच्या बिल क्लिंटन प्रशासनाने अनेक निर्बंध घातले होते. त्यावेळीही अनेक विचारवंतांनी तत्कालीन वाजपेयी सरकारच्या धोरणावर जोरादार टीका केली होती. वाजपेयी सरकारने त्या संकटातूनही मार्ग शोधला. देशांतर्गत मागणी वाढवण्याचा वाजपेयी सरकारचा मार्ग मोठा प्रभावशाली ठरला होता. देशभर राष्ट्रीय महामार्गांचे जाळे उभारण्यासाठी वाजपेयी सरकारने सुरू केलेली सुवर्ण चतुष्कोन योजना निर्णायक ठरली होती. १९९८ मध्ये भारतावर निर्बंध लादणारे बिल क्लिंटन हे दोनच वर्षांनी म्हणजे मार्च २००० मध्ये भारताच्या ५ दिवसांच्या दौऱ्यावर आले होते. अमेरिकेच्या अध्यक्षांचा आजपर्यंतचा हा सर्वात मोठा भारत दौरा ठरला. अशा अनेक आंतरराष्ट्रीय घटनांमध्ये भारत आपल्या भूमिकेवर ठाम राहिला आहे. आयात शुल्क वाढीच्या मुद्यातही भारत आपल्या भूमिकेपासून ढळलेला नाही. भारताच्या नव्या सामर्थ्याची आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर योग्य दखल घेतली जात आहे, हाच या घडामोडींचा अन्वयार्थ आहे. ■

# प्रस्तावित जीएसटी सुधारणा : विकासाच्या नव्या टप्प्याची सुरुवात

● मिलिंद कानडे

> २०१७ मध्ये लागू झालेला जीएसटी हा धाडसी पण गुंतागुंतीचा टप्पा होता. या दुसऱ्या टप्प्यातील सुधारणा हा आवश्यक कोर्स करेक्शन ठरू शकतो, जो भारताच्या अर्थव्यवस्थेला नव्या उंचीवर नेईल. योग्य व विचारपूर्वक अंमलबजावणी झाली तर ही सुधारणा केवळ करसुलभीकरणापुरती मर्यादित न राहता भारताची जागतिक स्पर्धात्मकता वाढविणारी ठरेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संकेत दिलेल्या प्रस्तावित जीएसटी सुधारणांच्या अनुषंगाने होणाऱ्या परिणामांना अधोरेखित करणारा हा लेख.

**भारताने** नुकताच ७९वा स्वातंत्र्यदिन साजरा केला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या भाषणात अनेक महत्त्वाच्या घोषणा झाल्या. त्यापैकी सर्वाधिक चर्चेत असलेली घोषणा म्हणजे वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) सुलभीकरणाची. अद्याप सविस्तर रूपरेषा जाहीर व्हायची असली तरी उद्योगविश्वात याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. नव्या प्रस्तावित व्यवस्थेत कर दोन प्रमुख स्लॅबमध्ये विभागला जाणार आहे. त्यानुसार, ५ टक्के जीएसटी हा दैनंदिन वापरातील आवश्यक व जास्त प्रमाणात खपणाऱ्या वस्तूंवर लागू होईल. तर, १८ टक्के जीएसटी उर्वरित बहुतांश वस्तूंवर लागू होणार आहे. ज्यामध्ये आतापर्यंत २८ टक्के स्लॅबमध्ये




असलेल्या अनेक वस्तूंचा समावेश असणार आहे. या निर्णयामुळे सरकारला सुरुवातीला महसूलात घट भासू शकते. परंतु, दीर्घकालीन विचार करता वाढलेली मागणी आणि कर सुलभीकरणामुळे वाढलेल्या व्यापाऱ्याचा फायदा सरकार आणि उद्योग जगत असा दोघांनाही होणार आहे. नवीन स्लॅबमुळे जीएसटी वर्गीकरणासंबंधीचे वाद कमी होतील. ग्राहकांची मागणी वाढल्यामुळे भारत हा मोठे बाजारपेठीय केंद्र ठरून विदेशी गुंतवणूकदार आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांना आकर्षित करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. जीएसटीच्या अंमलबजावणीत २०१७ मध्ये जसे गोंधळ, खटले व गैरसमज झाले होते, तसे प्रसंग टाळण्यासाठी या सुधारणा व्यवस्थित टप्प्याटप्प्याने राबवणे गरजेचे आहे. उद्योगजगत आणि सरकार यांच्यात सलोख्याने संवाद होऊनच हा बदल यशस्वी ठरू शकणार आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयानेही २०१७ प्रमाणे स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जारी केली पाहिजेत. त्यामुळे व्यवसायिकांना योग्य दिशा मिळेल व भविष्यातील वादविवाद टाळले जाऊ शकतील. जीएसटी सुधारणा हा मोठा टप्पा ठरणार असून सरकारच्या महसूलात तात्पुरती घट झाली तरी दीर्घकालीन दृष्टीने कर सुलभीकरण, वाढती मागणी, कमी झालेली करप्रशासनातील गुंतागुंत आणि सुधारलेली व्यवसाय सुलभता या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे.

## असे होतील फायदे

२०१७ मध्ये जीएसटी लागू झाल्यापासून करस्लॅबची

जास्तीची संख्या ही सर्वांसाठी डोकेदुखी ठरली. ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के अशा चार स्लॅबमध्ये जीएसटी विभागलेला आहे. यामुळे वस्तू व सेवांच्या वर्गीकरणावर वारंवार वाद निर्माण झालेत. प्रस्तावित सुधारणांमध्ये ५ टक्के आणि १८ टक्के असे दोन स्लॅब असणार आहे. नवीन कर प्रणालीमुळे वर्गीकरण सोपे होईल. उदाहरणार्थ, उत्पादन १२ टक्के की १८ टक्के श्रेणीत येते यावरून लांबलेले वाद संपतील. न्यायालयीन व कायदेशीर खर्चात बचत होईल. सोप्या करप्रणालीमुळे करदात्याचा करप्रणालीवरील विश्वास वाढेल. २८ टक्क्यांवरून १८ टक्के आणि १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांवर आणलेल्या अनेक वस्तूंवरील कमी करदरांमुळे उत्पादने अधिक स्वस्त होतील. ग्राहकांची खरेदी वाढेल. दैनंदिन गरजेच्या वस्तूंवर कमी खर्च होईल. ग्रामीण मागणीला चालना मिळेल. ग्रामीण भागातील कुटुंबांना किंमत कपातीचा सर्वाधिक फायदा होईल. मागणीत वाढ झाल्याने उत्पादन, रोजगार व उद्योगांची क्षमता वाढेल. काही क्षेत्रांमध्ये (उदा. वस्त्रोद्योग, पादत्राणे) कच्च्या मालावर जास्त कर तर तयार उत्पादनावर कमी कर लागू होत असल्याने उलटी कररचना (इनव्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर) निर्माण झाले होते. प्रस्तावित सुधारणांमुळे अतिरिक्त इनपुट टॅक्स क्रेडिट अडकणार नाही. कार्यक्षमता वाढेल. पुरवठा साखळी खर्चिक न राहता अधिक कार्यक्षम होईल. किंमती कमी होतील. करस्लॅबची संख्या कमी झाल्याने कर चुकवण्याचे मार्ग बंद होतील. पूर्वी गुंतागुंतीमुळे नोंदणी टाळणारे व्यवसाय आता स्वेच्छेने नवीन प्रणालीचा स्वीकार करतील. परिणामत: करआधार विस्तारित होईल. सरकारला दीर्घकाळात जास्त महसूल मिळेल. प्रामाणिक करदात्यांना गैरफायदा घेणाऱ्यांशी स्पर्धा करावी लागणार नाही. परकीय गुंतवणूकदार भारतातील करव्यवस्थेतील अनिश्चितेबद्दल नेहमीच चिंता व्यक्त करतात. करस्लॅब कमी झाल्याने स्थैर्य व पारदर्शकतेचा संदेश जाईल. गुंतवणूकदारांचा विश्वास संपादित करता येईल. जागतिक कंपन्यांना भारतातील कामकाजाची आखणी सोपी होईल. भारत सुधारणा करणारी अर्थव्यवस्था म्हणून उभी राहील. सध्याच्या विविध स्लॅबमुळे बिलिंग व लेखापालन गुंतागुंतीचे होते. स्लॅब कमी झाल्यास ते सुलभ होईल. प्रशासनिक खर्च कमी होईल. वेळेची बचत होईल. बिलिंग व फाइलिंग प्रक्रियेतील गती वाढेल. अर्थसंकल्पीय स्थैर्य येईल. काळा पैसा कमी होण्यास मदत होईल. जीडीपी वाढेल. मागणी आणि पुरवठा हे चक्र वाढते राहिले तर रोजगार निर्मिती होऊन त्यातदेखील वाढ होणार आहे. लाखोंच्या संख्येने बेरोजगार असलेल्या युवकांना यामुळे रोजगार उपलब्ध होईल. निर्यातदारांना अमेरिकेसोबतच्या व्यापारातील तोट्याबद्दल केंद्र सरकारकडून नुकसानभरपाई दिली जाण्याचीदेखील शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### भारताची जागतिक स्पर्धात्मकता वाढणार

जीएसटी परिषदेच्या सहमतीने दर सुधारणा होतील. यामुळे केंद्र व राज्यांमधील सहकार्य वाढेल. त्यामुळे स्थिर धोरण प्राप्त होणार आहे. तसेच या सुधारणांमुळे गुंतवणूकदार अनुकूल प्रतिमा निर्माण होण्यास मदत होईल. सर्वात महत्त्वाचे प्रशासनात सुलभ येईल. प्रस्तावित जीएसटी सुधारणा भारताची करप्रणाली अधिक सोपी, न्याय्य आणि विकासाभिमुख बनवतील. गुंतवणूकदारांचा विश्वास आणि सरकारला दीर्घकाळात मिळणारा महसूल वाढेल. २०१७ मध्ये लागू झालेला जीएसटी हा धाडसी पण गुंतागुंतीचा टप्पा होता. या दुसऱ्या टप्प्यातील सुधारणा हा आवश्यक कोर्स करेक्शन ठरू शकतो, जो भारताच्या अर्थव्यवस्थेला नव्या उंचीवर नेईल. योग्य व विचारपूर्वक अंमलबजावणी झाली तर ही सुधारणा केवळ करसुलभीकरणापुरती मर्यादित न राहता भारताची जागतिक स्पर्धात्मकता वाढवेल, हे निश्चित. सध्या भारत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लावलेल्या आयातशुल्कामुळे चिंतीत आहे. मात्र, कर कमी झाल्याने आणि सणासुदीला स्वदेशी वस्तूंची देशांतर्गत मागणी वाढल्यास निर्यातीची गरज कमी राहील. यामुळे भारतातील निर्यातदारांना सतावत असलेली टॅरिफ चिंता कमी होईल.

### क्षेत्रनिहाय लाभ असे

**वाहन उद्योग :** घटकांचे दर कमी झाल्यास वाहनांच्या किंमती कमी होतील.

**एफएमसीजी व किरकोळ व्यापार :** आवश्यक वस्तूंवर ५ टक्के करामुळे विक्रीत वाढ होईल.

**वस्त्र व पादत्राणे :** उलट्या कररचनेतून (इनव्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर) मुक्तता.

**हॉस्पिटॅलिटी क्षेत्र :** दर सुसूत्रीकरणामुळे पर्यटनाला चालना मिळेल. ■

# दसरा-दिवाळीत स्वस्ताईचा बार!

## जीएसटीमध्ये मोठे बदल लवकरच; ५ टक्के आणि १८ टक्के असे दोनच टप्पे!

अतिचैनीच्या, घातक वस्तूंवर मात्र ४० टक्के कर; मंत्रिगटाने दिली मान्यता; सर्वसामान्यांना मिळणार मोठा दिलासा. सणासुदीच्या तोंडावर एक आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारने सध्याची चारस्तरीय जीएसटी प्रणाली सोपी करून दोन टप्प्यांची करण्याचा प्रस्ताव दिला होता. याला मंत्री समुहाने नुकतीच मान्यता दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे येत्या दसरा-दिवाळीमध्ये अनेक वस्तू स्वस्त होण्याची शक्यता आहे.

**सध्याच्या** ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के या चार कर दरांऐवजी, आता केवळ ५ टक्के आणि १८ टक्के असे दोनच दर असतील. बिहारचे उपमुख्यमंत्री तथा जीएसटी मंत्रिगटाचे संयोजक सम्राट चौधरी यांनी सांगितले की, १२ टक्के आणि २८ टक्केचे दोन कर टप्पे रद्द करण्यास संमती देण्यात आली आहे. यामुळे दैनंदिन वापरातील अनेक वस्तू स्वस्त होणार आहेत. मात्र, अतिचैनीच्या (अल्ट्रालक्झरी) व 'घातक' (सिन गुइस) वस्तूंवर ४० टक्के कर लावण्याचाही समावेश आहे. **मंत्री समुहात बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान तसेच काँग्रेस, डावे आणि तृणमूल काँग्रेस शासित राज्ये आहेत. या समुहाने केलेल्या शिफारसी आता अंतिम निर्णयासाठी उच्चस्तरीय जीएसटी परिषदेकडे पाठविण्यात येतील. परिषदेच्या मंजुरीनंतर नवीन जीएसटी प्रणाली लागू होईल. ज्यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळू शकेल.**

### सर्वसामान्यांसाठी कोणत्या वस्तू होतील स्वस्त?

**१२ टक्के ऐवजी ५% जीएसटी कर स्लॅबमध्ये समावेश होण्याची शक्यता असलेल्या वस्तू खालीलप्रमाणे...**




सुकामेवा, ब्रेडेड नमकीन, टूथ पावडर, टूथपेस्ट, साबण, हेअर ऑइल, सामान्य अँटिबायोटिक्स, पेनकिलर औषधे, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ, स्नॅक्स, फ्रोजन भाज्या, कंडेन्स्ड मिल्क, काही मोबाईल आणि कॉम्प्युटर, शिवणकामाचे मशीन, प्रेशर कुकर, गिझर, विजेशिवाय चालणारे पाण्याचे फिल्टर, इलेक्ट्रिक इस्त्री, व्हॅक्यूम क्लिनर, १००० रुपयांपेक्षा जास्त किमतीचे तयार कपडे, ५०० ते १००० रुपयांच्या किमतीचे बूट, बहुतांश लसी, एचआयव्ही/टीबी डायग्नोस्टिक किट, सायकल आणि भांडी, कंपास पेटी, नकाशे, ग्लेज्ड टाइल्स, प्री-फॅब्रिकेटेड बिल्डिंग, व्हेंडिंग मशीन, सार्वजनिक वाहतुकीची वाहने, शेतीची यंत्रसामग्री, सोलर वॉटर हिटर.



**खालील वस्तूंची २८ ऐवजी १८% स्लॅबमध्ये समावेशाची शक्यता**

सिमेंट, सौंदर्य प्रसाधने, चॉकलेट, रेडी-मिक्स काँक्रीट, टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशीन, एसी, डिशवॉशर, वैयक्तिक विमाने, प्रोटीन कॉन्संट्रेट, साखरेचे सिरप, कॉफी कॉन्संट्रेट, प्लास्टिक उत्पादने, रबरचे टायर, अल्युमिनियम फॉइल, टेम्पर्ड ग्लास, प्रिंटर, रेझर, मॅनिक्युअर किट, डेंटल फ्लॉस.


# युवराज- राजकारणातला 'स्क्रोल'

● चंद्रहास मिरासदार

> युवराजांनी काही दिवसांपूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेनंतर पत्रकारितेतील काही विचारवंत आणि ज्ञानवंतांना हर्षवायू झाला होता. युवराजांनी केलेल्या निवडणूक आयोगाच्या भांडेफोडामुळे देशात आता क्रांती होऊन सत्ताबदल घडणार अशी खात्रीच वाटू लागली होती. काही अति सूक्ष्म विचारवंत पत्रकारांना युवराजांच्या ''ऐतिहासिक'' पत्रकार परिषदेनंतर बिहारमध्ये युवराजांच्या लोकप्रियतेची लाट आली असल्याचा साक्षात्कार झाला होता. या स्वयंघोषित ऐतिहासिक पत्रकार परिषदेची आता पुरती पोलखोल झाली आहे.



**सीएसडीएस–** लोकनीती या मतदान अंदाज वर्तविणाऱ्या संस्थेचे सह संस्थापक संजय कुमार यांनी १९ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीबाबत केलेले ट्विट मागे घेत असल्याचे जाहीर करीत या ट्विटबद्दल सपशेल माफी मागितली. अनेकांना या संजय कुमार बाबत माहिती नाही, असण्याचे कारणही नाही. या संजय कुमारांनी महाराष्ट्रातील देवळाली, रामटेक या विधानसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत सुमारे ३५ टक्के मतदार कमी झाल्याचा दावा केला होता. या दोन्ही मतदारसंघात मतदार एवढ्या मोठ्या संख्येने मतदार कमी केले गेल्याने भाजपा–महायुतीच्या उमेदवारांचा विजय झाला, असा आरोप काँग्रेसकडून केला गेला होता. या संजय कुमार यांनी १७ ऑगस्ट रोजी टाईम्स ऑफ इंडियामध्ये भला मोठ्ठा लेख लिहून निवडणूक आयोग काँग्रेसच्या आरोपांना उत्तर देत नाही असे म्हणत निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केलं. अशा या संजय कुमारांनी आपले ट्विट मागे घेताना रामटेक, देवळाली या विधानसभा मतदार संघातील मतदारांच्या आकडेवारीबाबत आपले निष्कर्ष चुकले, अशी कबुली दिली. या संजय कुमारांनी टाईम्समधील आपल्या लेखात राहुल गांधींनी पत्रकार परिषदेत बंगळुरूमधील मंजुपुरा विधानसभा मतदारसंघात एकाच पत्त्यावर अनेक मतदारांची नोंदणी असल्याच्या आरोपाचा उल्लेख केला होता. तर विषय होता युवराजांचा. एकाच पत्त्यावर अनेक मतदार, मतदारांची चुकीची अपुरी नावे, एकाच मतदारांची अनेक ठिकाणी नावे अशा त्रुटी शोधून काढत युवराजांनी निवडणूक आयोगावर भाजपासाठी मतचोरी चा आरोप केला. आदित्य श्रीवास्तव या मतदाराचा उल्लेख युवराजाने केला. या श्रीवास्तवने आपण नाव कमी करण्यासाठी अर्ज दिला होता असे स्पष्ट करून एकाच ठिकाणी मतदान केल्याचा खुलासा केला होता. एकाच पत्त्यावर अनेक मतदार, मतदारांची चुकीची अपुरी नावे, एकाच मतदारांची अनेक ठिकाणी नावे या मालमसाल्यावर युवराजांच्या सलीम – जावेद, कादर खान, सचिन भौमिक,




प्रयाग राज, के. के. शुक्ला या कथा-पटकथा लेखकांनी पत्रकार परिषदेची संहिता तयार करून दिली.

'वोट चोरी' असं सनसनाटी नाव देऊन देशभर समाज माध्यमांच्या माध्यमातून एकच कालवा केला गेला. या आरोपांचा फुगा संजय कुमारच्या माफीनाम्यानंतर फुटला आहे. अर्धवट माहितीच्या सुताच्या आधारे वोट चोरीच्या स्वर्गापर्यंत मजल मारणाऱ्या युवराजाने आपल्या आरोपांबाबत निवडणूक आयोगाकडे अजूनही शपथपत्र दिलेले नाही. याच अर्धवट माहितीच्या आधारे युवराज बिहारमध्ये वोट अधिकार यात्रा काढत आहेत. युवराजांचे राजकारणातले कच्चे लिंबू पण पुन्हा सिद्ध झाले आहे. त्यामुळेच युवराजाला भारतीय गंभीरपणे घेत नाहीत. इन्स्टा, फेबुवर आलेल्या जाहिरातीच्या, मनोरंजनाच्या पोस्ट लोकं लक्ष न देता पुढे ढकलत राहतात, म्हणजेच स्क्रोल करीत राहतात, तशीच स्थिती युवराजाची झाली आहे. (सलीम-जावेद, कादर खान, सचिन भौमिक, प्रयाग राज, के. के. शुक्ला ही १९७०-८० च्या दशकातील हिंदी चित्रपट कथा-पटकथा लेखकांची मांदियाळी. यापैकी सलीम जावेद जोडी सर्वांना ठाऊक आहे. कादर खानही माहिती आहे. मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा, नासीर हुसेन व अन्य दिग्दर्शकांच्या चित्रपटांत बुद्धीला न पटणारे अतर्क्य, अवास्तव प्रसंग असायचे त्याचे जनक कादर खान, प्रयाग राज, के. के. शुक्ला हे पटकथा लेखक असायचे. तसेच कोणी तरी लेखक युवराजांना मिळाले असावेत.)

### संजय कुमारांच्या माफीनाम्यानंतरचे पत्रकार, विचारवंतांचे 'मौन'

निवडणुकीचे मतदानापूर्वीचे आणि मतदानानंतरचे अंदाज वर्तविणाऱ्या सीडीएसएस- लोकनीती या संस्थेचे संजय कुमार यांनी महाराष्ट्रातील निवडणुकीबाबत समाज माध्यमांवर केलेल्या पोस्ट मागे घेत या पोस्टमधील माहिती चुकीची असल्याची कबुली देत त्याबद्दल मनःपूर्वक माफीही मागितली आहे. या माफीनाम्यानंतर रिपब्लिक वाहिनीवर अर्णब गोस्वामीने या संजय कुमारांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत संजय कुमारांनी निवडणूक आयोगासंदर्भात केलेल्या पोस्टचे




पुरते शवविच्छेदन झाले. रामटेक, देवळाली या विधानसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत मोठी घट झाल्याचा दावा या संजय कुमारांनी केला होता. रामटेक मतदारसंघात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीवेळी ४ लाख ६६ हजार २०३ मतदार होते, मात्र विधानसभा निवडणुकीत मतदारांची संख्या १ लाख ७९ हजार २७२ ने कमी म्हणजे ३८ टक्क्यांनी कमी होऊन ती २ लाख ८६ हजार ९३१ झाली. तर देवळाली विधानसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीवेळी ४ लाख ५६ हजार ७२ मतदार होते, विधानसभा निवडणुकीत देवळालीतील मतदार १ लाख ६७ हजार ९३१ ने कमी होऊन ते २ लाख ८८ हजार १४१ झाले, असे ट्विट संजय कुमारांनी केले होते. या दोन्ही मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले होते. आपण मतदार संख्येबाबत काढलेले निष्कर्ष चुकीचे होते, असे म्हणत संजय कुमार माफी मागून मोकळे झाले. पण हे प्रकरण दिसते तेवढे सरळ, सोपे नाही. याच संजय कुमारांनी १७ ऑगस्ट रोजी टाईम्स ऑफ इंडियातील लेखात बिहारमधील मतदार यादी पडताळणी वरून निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली होती. बिहारमध्ये युवराजांची मत अधिकार यात्रा चालू होण्याच्या दिवशीच संजय कुमारांनी महाराष्ट्रातील मतदार आकड्यांबाबतचे ट्विट केले होते. युवराजांच्या आरोपांना पुष्टी देणारे हे ट्विट होते. काँग्रेसच्या पवन खेरा नामक प्रवक्त्याने संजय कुमारांच्या ट्विटच्या आधारे ट्विट करीत व्होट चोरीचा आरोप केला होता. निवडणूक आयोगाच्या यंत्रणेतील त्रुटी, चुका दाखवून देण्यात काहीच चूक नाही. मात्र या त्रुटींना जाणीवपूर्वक राजकीय रंग देत एखाद्या राजकीय पक्षाच्या फायद्यासाठी हे घडवून आणले जात आहे, असा भ्रम निर्माण करून सरकारी संस्थांना बदनाम करण्याचा, सरकारी कर्मचाऱ्यांना अप्रामाणिक ठरवण्याचा हा निर्लज्ज प्रयत्न आहे. सामान्य नागरिकांच्या मनात संविधानिक संस्थांच्या बद्दल अविश्वास निर्माण करण्याचाच हा प्रयत्न आहे. देशातले सर्व सरकारी कर्मचारी भाजपासाठी काम करताहेत, असा संशय युवराज राहुल गांधींना निर्माण करायचा आहे. संजय कुमारांनी हाच प्रयत्न आपल्या ट्विटच्या आडून केला होता. मात्र युवराजांना निवडणूक आयोगाने आपल्या आरोपांबाबत शपथपत्र दाखल करा अन्यथा देशाची माफी मागा, असा इशारा दिल्यानंतर संजय कुमारांनी माफी मागितली आहे. युवराजांच्या पत्रकार परिषदेच्या आधारे निवडणूक आयोगावर, पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीकेचे जहरी बाण सोडण्यात अनेक पत्रकार, विचारवंत आघाडीवर होते. या मंडळींनी संजय कुमारांच्या माफीनाम्यानंतर मात्र मौन बाळगले आहे. काय बोलावे हे त्यांना सुचेनासे झाले आहे. ■

# खोटा प्रचार करणा-यांना आणखी एक सणसणीत चपराक

## महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार नाहीत सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा; याचिका फेटाळली

● आनंद देवधर

> मतदान संपेपर्यंत संध्याकाळी ६ वाजल्यानंतर ७६ लाख मतदान झाल्याच्या आधारावर २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या वैधतेला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच फेटाळून लावली.

**याच** विषयावर मी ३ डिसेंबर २०२४ रोजी एक पोस्ट केली होती त्यातील हा भाग पुन्हा एकदा शेअर करत आहे. अनेक सामान्य माणसे फक्त मराठी चॅनल्स बघतात आणि लोकसत्ता, सकाळ, लोकमत वाचून स्वतःचे मत बनवतात. अशांना मी राजकीय अशिक्षित म्हणतो. शेवटच्या तासात वाढलेल्या टक्केवारीची पोलखोल करूया. आपल्याला हव्या त्याच पद्धतीने आकडेवारी लोकांसमोर आणायची आणि सोयीस्कर अर्थ लावायचा हा नीच धंदा सध्या चालू आहे. शेवटच्या तासात इतके मतदान कसे वाढले हा मुख्य प्रश्न आहे. ते खरोखरच वाढले आहे का?

एक गोष्ट सगळे विसरत आहेत की मतदान शेवटच्या तासात नाही वाढले ते वाढायला सुरुवात दुपारी ३ वाजल्यापासून झाली होती. दुपारी ३ ते ५ या दोन तासांमध्ये १३.२२% मतदान वाढले होते म्हणजे तासाला सरासरी ६.६१% आता ५ वाजता जाहीर झालेली टक्केवारी होती ५८.२२ आणि अंतिम टक्केवारी होती ६६.०५ म्हणजे शेवटच्या एका तासात आणि त्यानंतर ६ वाजता रांगेत उभे



असलेल्या लोकांचे मिळून एकूण मतदान ७.८३ टक्क्यांनी वाढले. ज्या एका मुद्याकडे कोणीही लक्ष दिलेले नाही तो मुद्दा असा की दुपारी ३ नंतर वाढलेला टक्केवारीचा ताशी वेग बघता ७.८३% ही वाढ अगदीच नॉर्मल आहे. यात ५ ते ६ हा अधिकृत एक तास आणि त्यानंतर रांगेत उभे असलेल्या टोकन घेतलेल्या लोकांचे मतदान संपेपर्यंत लागलेला वेळ या काळासाठीची ही टक्केवारी आहे. प्रत्येक मतदारसंघात हा वाढीव वेळ वेगवेगळा असतो. यात शंका व्यक्त करण्यासारखे काहीही नाही.

५ वाजता जाहीर झालेली टक्केवारी ही provisional होती. Final नव्हती. याबाबतचा व्यवस्थित खुलासा महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी



यांनी केला आहे. त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत सुद्धा ५ वाजता जाहीर झालेली provisional टक्केवारी आणि अंतिम टक्केवारी यात ७% इतकीच वाढ झाली होती.

आता ५ वाजल्यानंतर नक्की किती मते पडली त्याची आकडेवारी बघू. एकूण मतदार संख्या ९.७० कोटी त्याच्या ७.८३% काढा.. उत्तर येते ७५.९७ लाख.

महाविकास आघाडीचे नेते आणि त्यांची चाटूकार मीडिया तुम्हाला ७६ लाखाचा आकडा दाखवून एकदम भांबावून सोडते. पण हीच आकडेवारी तुम्ही ३ ते ५ या वेळात किती पडली त्या तुलनेत वाचा.

३ ते ५ या दोन तासांत १३.२२% म्हणजेच १.२८ कोटी मतदान झाले तर ५ वाजल्यानंतर ७६ लाख मतदान वाढले. याला statistical and logical base आहे हे तुम्हाला कोणीही समजावून सांगितलेले नाही.

The momentum picked up from 3:00 p.m. Period. अजून एक गोष्ट जी चहा बिस्किटांपैकी कोणीही नजरेस आणून दिली नाही ती अशी. या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात एकूण १००१८६ बूथ होते. म्हणजे ५ वाजल्यानंतर मतदान संपेपर्यंत प्रतिबूथ सरासरी किती

**राहुल गांधी, उद्धव ठाकरे, शरद पवार या सर्व मंडळींनी निकालानंतर ईव्हीएमबद्दल संशय व्यक्त केला. शरद पवाराच्या गटाचे आ.उत्तम जानकर यांनी आपल्या मतदारसंघातील एका गावात मतपत्रिकेद्वारे फेर मतदान करण्याची मागणी केली. निवडणूक आयोगाने या मंडळींच्या प्रत्येक आक्षेपाला व्यवस्थित उत्तर दिले आहे. शरद पवारांच्या कन्या खा.सुप्रिया सुळे यांनीही ईव्हीएमबद्दल शंका घेणे चुकीचे आहे, असे जाहीरपणे सांगितले होते. राहुल गांधींनी मग संध्याकाळी ६ नंतर झालेल्या मतदानाचा मुद्दा काढला. याबद्दलही निवडणूक आयोगाने समाधानकारक स्पष्टीकरण दिले होते.**


मते वाढली? फक्त ७६. यात अनाकलनीय, अविश्वसनीय, अघटीत, आश्चर्यकारक असे काय आहे? आकडेवारी तीच असते परंतु ती कशा पद्धतीने मांडायची याला महत्त्व आहे. वाढीव मतदानासंबंधीत चहा-बिस्कीट पत्रकारांनी सुरू केलेल्या उच्छादाची ही उत्तरक्रिया आहे. या मुद्द्यावर भुंकणाऱ्या कोणत्याही चहा बिस्कीट पत्रकाराला चॅलेंज करता येऊ शकते. ■

# जातनिहाय जनगणना : विपर्यास, अपप्रचार व वास्तव

● माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)

> भारतीय जनता पार्टीचे टीकाकार नेहमी असा दावा करतात की, भारतीय जनता पार्टी ही ओबीसींची पार्टी आहे. ही वस्तुस्थिती आहे. पण भाजपा केवळ ओबीसीची नाही ही महाराष्ट्रातल्या, देशातल्या सगळ्या समाजाची पार्टी आहे. तो मुद्दा बाजूला ठेवू. हे काम करत असताना आम्हाला अनेक नवे मुद्दे लक्षात आले.

**महाराष्ट्रामध्ये** सुद्धा छोटे-छोटे समुदाय किती आहेत याची कल्पनाही आम्हाला त्यावेळेपर्यंत नव्हती, ही कल्पना या कामामुळे आम्हाला आली. त्यांचे प्रश्न काय आहेत, अडचणी काय आहेत ते सोडवण्यासाठी काय करता येईल हे सगळे त्यातून उलगडत गेले. त्यामुळे भारतीय जनता पार्टी म्हणून जो प्रयत्न करत होतो त्यामधून गोपीनाथ मुंडे आणि आम्ही काही कार्यकर्ते या निष्कर्षावर आलो होतो की जातनिहाय जनगणना अत्यंत आवश्यक आहे. जातनिहाय जनगणना केल्याशिवाय हा जो सर्वात उपेक्षित, दुर्लक्षित वर्ग आहे त्याचं वास्तव आपल्याला समोर आणता येणार नाही, त्याला संरक्षण देता येणार नाही. म्हणून साधारण २००६-०७ पासून आम्ही हा विषय मांडायला सुरुवात केली होती. २००९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत गोपीनाथजी लोकसभेत निवडून गेले. लोकसभेत पक्षाचे उपनेता झाले. लोकसभेमध्ये त्यांनी जे पहिले भाषण केले त्यातच जातनिहाय जनगणना व तिची निकड हा मुद्दा त्यांनी मांडला होता. हा इतिहास तपशिलाने अशासाठी सांगितला की जातनिहाय जनगणना आपल्याला कधीच मान्य नव्हती, राहुल गांधी आणि लालू यादव यांच्या आग्रहाने आपल्याला मान्य करावे लागले, असे चित्र रंगवण्याचा जो प्रयत्न केला जात आहे ते धादांत खोटं आहे. भाजपाने जेव्हा २००६-०७ साली ही मागणी मांडायला सुरुवात केली होती तेव्हा काँग्रेस सकट अन्य कुठलाही राजकीय पक्ष या विषयाची चर्चा करायला तयार नव्हता. गोपीनाथजींनी लोकसभेमध्ये हा मुद्दा उपस्थित केला, त्याला सत्ताधारी काँग्रेसने उत्तरसुद्धा दिले नाही. उलट काही वेळेला असे चित्र रंगवण्याचा प्रयत्न केला गेला की गोपीनाथ मुंडे आणि भारतीय जनता पार्टी यांच्यामध्ये ह्या विषयावर मतभेद आहेत. इतक्या टोकाला जाऊन खोटारडेपणा करण्याचा काँग्रेस व डाव्या प्रचारयंत्रणेचा स्वभाव आहे, त्यांचे ते घोटून घोटून तयार केलेले तंत्र आहे. गोपीनाथ मुंडे हे एकटेच जातनिहाय जनगणनेबाबत बोलत आहेत आणि पार्टीला ते मान्य नव्हते






असे चित्र रंगवण्याचा प्रयत्न सातत्याने केला गेला. पण, भाजपाचा लोकसभेतील उपनेता, लोकसभेत पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या अटलजी–अडवाणीजींच्या शेजारी बसून त्या मंचावरून जातनिहाय गणनेची मागणी करतो, पक्षातील सगळे खासदार त्यांच्या म्हणण्याला दुजोरा देतात, ही वस्तुस्थिती असताना भारतीय जनता पार्टी व गोपीनाथ मुंडे यांच्यात मतभेद कसे असू शकतील हा प्रश्न कोणीही विचारात घेतला नाही. कारण त्याशिवाय विपर्यास करता आला नसता. कै.गोपीनाथजी लोकसभेमध्ये आणि महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात, प्रसारमाध्यमांमध्ये मी स्वतः आम्ही दोघांनी हा विषय २००७ पासून सातत्याने मांडला. त्याच्यावर प्रसारमाध्यमांमध्ये अनेक खडाजंगी चर्चा झाल्या. वस्तुस्थिती ही आहे की हा भाजपाने सुरु केलेला मुद्दा आहे कोणी दुसऱ्याने त्याचे श्रेय लाटण्यासाठी खोटे बोलत राहणे योग्य नाही.

भारतीय जनता पार्टी जेव्हा ह्या मुद्यावर काम करायला लागली, तेव्हा त्या विषयावर संपूर्ण विचार परिवारामध्ये खूप चर्चा करून ह्या विषयाला सगळ्यांची सहमती घेऊन मगच तो निर्णय घेतला गेला होता. हा निर्णय सर्वसहमतीने करवून घेण्यामध्ये कै.वसंतराव भागवत यांचा सर्वात मोठा वाटा होता. जातनिहाय जनगणनेसाठी भाजपाने इतका आग्रह धरल्यामुळे तेव्हाच्या काँग्रेस सरकारला या विषयातली हवा काढून घेण्याची गरज वाटायला लागली. तसा प्रयत्न करण्यासाठी डॉ.मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारला २०११ मध्ये जातनिहाय गणना करण्याचा निर्णय घ्यावा लागला. पण त्यांनी ते जनगणनेचा भाग म्हणून न करता त्याला एक वेगळे नाव व सर्वेक्षणाचा दर्जा दिला. त्यानुसार २०११ ची जनगणना करताना त्यांनी जातनिहाय सर्वेक्षण केले. पण त्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष, आकडेवारी जाहीर केली नाही. त्यांनी ही आकडेवारी लोकसभेमध्ये सुद्धा मांडली नाही. नंतर २०१४ मध्ये आपले सरकार आले. डॉ.मनमोहन सिंग सरकारने केलेल्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष आपण २०१६ मध्ये लोकसभेत मांडले पण आपण तो अहवाल फेटायला. कारण त्याच्यामध्ये अनेक गफलती मुद्दाम केलेल्या होत्या. मंडल आयोगाने अन्य मागासवर्गीय म्हणून साडेचार हजारपेक्षा जास्त समूहांची नोंद केली होती, काँग्रेस सरकारने केलेल्या सर्वेक्षणानुसार ही आकडेवारी काही लाख समुदायांमध्ये पोचली होती. बाकी त्यामध्ये अन्य अनेक दोष होते ते वेगळे! त्यामुळे तो अहवाल आपण

फेटाळला. हे खरे असले तरी आपण ती संकल्पना फेटाळली असा त्याचा अर्थ होत नाही. एकदा आपण सामाजिक न्यायाचा भाग म्हणून आरक्षणाचे तत्व स्वीकारले आणि समाजातल्या वेगवेगळ्या समुदायांना, वेगवेगळ्या समूहांना आरक्षण देण्याचा निर्णय संविधानाच्या चौकटीमध्ये बसून करायला लागलो तर त्याला शास्त्रशुद्ध जनगणनेचा आधार दिलाच पाहिजे, त्याशिवाय योग्य पद्धतीचे आरक्षण देता येत नाही. म्हणून भाजपाने हा आग्रह १९०६-०७ पासून धरला होता. त्या संदर्भातला निर्णय या वेळेला झाला.

याच्यामध्ये आणखी दोन महत्त्वाचे मुद्दे आहेत. २०२७ मध्ये जशी जनगणना सुरू होणार आहे तसेच २०२७ मध्ये भारतातल्या सर्व प्रकारच्या मतदारसंघांची फेररचना होणार आहे. मतदारसंघाची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाढवण्याचा निर्णय केंद्र सरकारने ह्या पूर्वीच जाहीर केलेला आहे. त्यानुसार लोकसभेचे आज ५८८ मतदारसंघ आहेत ते ८०० च्या घरात जातील. त्या प्रमाणात विधानसभा, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती या सर्व स्तरावरचे मतदारसंघ वाढणार आहेत. या वाढलेल्या मतदारसंघांना प्रत्येक स्तरावर विविध आरक्षणे द्यायची आहेत. शास्त्रशुद्ध जनगणना हाताशी नसेल तर वेगवेगळ्या पद्धतीची आरक्षणे देणे अत्यंत अवघड आहे. आज अशा पद्धतीची जनगणना नसल्यामुळे अनेक मतदारसंघांमध्ये विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असा अनुभव येतो की एखादे क्षेत्र एखाद्या प्रवर्गासाठी राखीव केले जाते पण त्या प्रभागामध्ये ती लोकसंख्याच नसते. तर कधी कधी ज्या प्रवर्गाची मोठी संख्या असते त्यांना आरक्षण मिळत नाही. आपण शास्त्रशुद्ध गणना करून त्याच्या आधारे आरक्षणाचे रचना करत नाही म्हणून असे प्रकार होतात व त्यातून आरक्षणाच्या संकल्पनेचाच पराभव होतो. केंद्र सरकारचा आज हा प्रयत्न आहे की मतदारसंघ फेररचना करून आरक्षण देताना त्याला शास्त्रशुद्ध जनगणनेचा आधार असावा, त्याच्या आधारावर आरक्षण दिले जावे. त्याच्याआधारे फेररचना व्हावी. खरे तर ज्या दिवशी मतदारसंघाच्या फेररचनेचा निर्णय जाहीर झाला, त्याच दिवशी हे स्पष्ट झाले होते की जातनिहाय जनगणना करावी लागेल, केली जाईल. त्यामुळे हा निर्णय कोणत्याही अर्थाने अनपेक्षित नव्हता. विरोधी पक्षांच्या दबावामुळे घेतलेला निर्णय देखील

> **श्रीमती इंदिरा गांधी यांनी पंतप्रधान असताना ओबीसी आरक्षण देणाऱ्या मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी कधीच केली नाही. राजीव गांधींनीही या आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी केली नाही. मंडल आयोगाविरोधात १९९० मध्ये आंदोलन सुरू झाल्यावर राजीव गांधी यांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. लोकसभेत तसे भाषणही केले होते.**

नव्हता. हा निर्णय भाजपाच्या सातत्यपूर्ण भूमिकेमुळे आणि वास्तवातल्या गरजेमुळे घेतलेला निर्णय आहे. प्रत्येक निर्णयाचे काही फायदे असतात, काही तोटे असतात. या निर्णयाबद्दल आरक्षणाच्या बाजूने जे काही मुद्दे होते ते स्पष्ट केले. काही तोटे नक्की होतील. 'आपण जात व्यवस्था नष्ट करायला निघालो तर मग जातींच्या नोंदी का करायच्या?' हे १९५१ सालचे तर्कशास्त्र आजही लागू पडणारे आहे. पण ते तत्व आणि तर्कशास्त्र १९५१ मध्येच मागे पडले. जी व्यवस्था आज स्वीकारली आहे त्या व्यवस्थेची ही गरज आहे. अपप्रचाराचे तंत्र कसे आहे ते सुद्धा लक्षात घेतले पाहिजे. ह्या विषयामध्ये भारतीय जनता पार्टीच्या भूमिकेपेक्षा अन्य पक्षांची पूर्ण वेगळी भूमिका होती. ही भूमिका भारतीय जनता पार्टीने सातत्याने घेतली. भारतीय जनता पार्टीच्या भूमिकेमध्ये कुठेही विसंगती नाही, सातत्याचा अभाव नाही. उलट काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी ह्या विषयात अनेक कोलांटउड्या मारल्या आहेत. ज्यावेळी गोपीनाथजी लोकसभेमध्ये जातनिहाय जनगणनेचा मुद्दा मांडत होते त्यावेळी काँग्रेससकट बाकीचे पक्ष त्यांना विरोध करत होते. ज्यांनी कोलांट्या उड्या मारल्या व जातनिहाय जनगणना टाळायचा प्रयत्न नेहेमी केला तेच आज केवळ श्रेय घेण्यासाठी भाजपाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत आहेत, हा त्यांच्या अपप्रचार तंत्राचा भाग झाला. आत्ता सुद्धा प्रचाराच्या सगळ्या गदारोळामध्ये ज्या मुद्द्यांचा काही संबंध नाही, असे अनेक चुकीचे, खोटे मुद्दे दडपून मांडले जातात. खूप मोठ्या आवाजात मांडले जातात म्हणून तेच फक्त ऐकले जातात. जे वास्तव मुद्दे आहेत ते योग्य पद्धतीने ऐकले जात नाहीत, त्यांना जागा मिळत नाही. म्हणून एक वेगळे वातावरण तयार होते. आपण खरे मुद्दे व वास्तविकता जनतेसमोर मांडली पाहिजे.

**(समाप्त)**

# मुख्यमंत्री देवेंद्रजींच्या नागपूर जनसंपर्क कार्यालयास प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जनसंपर्क कार्यालयास त्यांच्या वाढदिवसा निमित्ताने भेट देण्याचे प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांचे कोणतेही नियोजन नव्हते. श्री. चव्हाण यांचा नियोजित कार्यक्रम होता तो वर्धा येथे. देवेंद्रजींच्या जनसंपर्क कार्यालयाची कार्यपध्दती जाणून घेण्याची त्यांना उत्सुकता होती. निमित्त होते ते देवेंद्रजींच्या ५५ व्या वाढदिवसाचे. अशा दुग्धशर्करा योगाच्या निमित्ताने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी देवेंद्रजीच्या जनसंपर्क कार्यालयास दिलेली धावती भेट अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरली.

### देवेंद्रजींचा जनसंपर्क कार्यालयातील ५५ वा वाढदिवस

देवेंद्रजींचा वाढदिवस हा त्यांच्या कार्यकर्त्यांकरिता नाना विविध कार्यक्रमांची पर्वणी असते. देवेंद्रजींना मनापासून श्रध्दास्थानी मानणारे अनेक कार्यकर्ते स्वत:हून त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने दरवर्षी अनेक सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करतात आणि स्वत:च्याच घरचे कार्य म्हणून साजरा करतात. परंतु, या सर्व कार्यक्रमामध्ये देवेंद्रजींचा कोणताही सहभाग नसतो आणि ते या दिवशी सर्वसामान्य जनतेमध्ये आपला वाढदिवस साजरा करतात. २२ जुलै २०२५ चा त्यांचा ५५ वा वाढदिवस दोन




गोष्टीमुळे नाविन्यपूर्ण ठरला. एकतर देवेंद्रजी मुख्यमंत्री आणि त्यातही प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची या कार्यक्रमानिमित्ताने त्यांनी देवेंद्रजींच्या कार्यालयास दिलेली धावती भेट. या दोन्ही घटनेमुळे देवेंद्रजींचा ५५ वा वाढदिवस नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघातील जनतेकरिता त्याबरोबर कार्यकर्त्याकरिता अत्यंत आनंदायी ठरला. परंतु, देवेंद्रजी मात्र या दिवशी गडचिरोली जिल्ह्यामध्ये आदिवासी जनतेच्या सहवासामध्ये आपला वाढदिवस साजरा करीत होते.

मुख्यमंत्री देवेंद्रजींच्या नागपूरच्या जनसंपर्क कार्यालयास त्यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्ताने भेट देण्याचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे कोणतेही नियोजन नव्हते. नाहीतर ही बातमी नागपूरच्या सर्व वृत्तपत्रामध्ये आधीच प्रसिध्द झाली असती. रवींद्र चव्हाण यांचा नियोजित कार्यक्रम वर्धा येथे होता. परंतु, देवेंद्रजीचे नागपूर येथील जनसंपर्क कार्यालयात राबविण्यात येत असलेल्या सामाजिक कार्यक्रमाची प्रसिध्दी त्यांच्याही कानावर गेली असल्यामुळे त्यांनाही या कार्यालयास भेट देण्याची उत्सूकता होती. तेव्हा त्यांनी वर्धा येथील कार्यक्रमाच्या निमित्ताने काही वेळ या कार्यालयास भेट देण्याकरिता राखीव ठेवला होता. देवेंद्रजींच्या वाढदिवसानिमित्ताने या कार्यालयामध्ये सामाजिक सेवा देणाऱ्या कार्यकर्त्यांनी





अनेक कार्यक्रमाचे आयोजन या पूर्वीच जाहीर केले होते परंतु, प्रदेशाध्यक्षाची भेट ही त्यांच्या आनंदामध्ये आणखी भर घालणारी ठरली. प्रदेशाध्यक्ष देवेंद्रजींच्या कार्यालयास भेट देणार म्हणून विधान परिषदेचे आ. संदीप जोशी, आ.प्रविण दटके, माजी महापौर दयाशंकर तिवारी विदर्भ संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर, अश्विनी जिचकार, विष्णु चांगदे, शिवानी दाणी, माजी महापौर अर्चना डेहनकर, नंदा जिचकर, शहर दक्षिण पश्चिम मंडलाचे नवनिर्वाचित अध्यक्ष दिलीप दवे, महेंद्र भुगांवकर, ईश्वर ढेंगळे, विनोद शिंदे अशा चारही मंडलातील कार्यकर्त्यांनी आर्वजून हजेरी लावली होती. १० मिनिटीच्या भेटीकरिता आलेले प्रदेशाध्यक्ष एक तासापेक्षा अधिक काळ या ठिकाणी होत असलेल्या सामाजिक कार्यक्रमाची माहिती घेत होते. जवळजवळ अर्धा तास कार्यालय प्रमुख सुनिल मित्रा, कार्यालयीन समन्वयक श्रेया पाटील आणि कार्यालयीन जनसंपर्क प्रमुख नितीन महाजन यांनी या कार्यालयात आठवड्याच्या सातही दिवस चालणाऱ्या विविध सामाजिक कार्यक्रमांची माहिती दिली. जनसंपर्क कार्यालयाची माहिती जाणून घेतल्यानंतर त्यांची पावले पडली ती या ठिकाणी आजच्या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाकडे. देवेंद्रजींच्या ५५ वा वाढदिवस साजरा करण्याच्या कार्यक्रमास सुरवात झाली ती, रक्तदान शिबीर आणि वैद्यकीय तपासणी शिबीराने.

देवेंद्रजींच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्ताने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी महाराष्ट्रातील भाजप कार्यकर्त्यांना महारक्तदान शिबीर करुन एक विक्रम करण्याचे आवाहन केले होते. राज्यातील कार्यकर्त्यांनी १ हजार ८८ ठिकाणी महारक्तदान शिबीर आयोजित करुन या उपक्रमात एकूण ७८ हजार ३१३ बाटल्या रक्त संकलन केले. एकाच दिवशी सर्वाधिक ठिकाणी घेण्यात आलेली रक्तदान शिबीरे आणि एकाच दिवशी सर्वाधिक रक्त संकलित करणे असे दोन्ही विक्रम एकाच दिवशी झाले. या विक्रमी उपक्रमाची नोंद मानाच्या 'एशिया बुक ऑफ रेकॉर्डस्' मध्ये घेण्यात आली आहे. या कार्यालयामध्ये काही तासामध्ये ३०० पेक्षा अधिक बाटल्या रक्त संकलित झाले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे रक्तदान शिबीरातील सर्व कार्यक्रमातील घटनांचे साक्षीदार स्वत: प्रदेशाध्यक्ष होते. ही रक्तदात्यांच्या दृष्टीने आनंदाची पर्वणी होती. रक्तदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या रक्तदात्यांना प्रमाणपत्रे आणि भेट साहित्य देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या वैद्यकीय शिबीरामध्ये रक्त तपासणी शिबीर, डोळे तपासणी व मोफत चष्म्याचे वाटप आणि इतरही वैद्यकीय सेवांचे आयोजन केले होते. या वैद्यकीय शिबीरातील सर्वात महत्वाचे आकर्षण होते ते, या ठिकाणी नव्यानेच आणल्या गेलेल्या स्वयंचलीत वैद्यकीय चाचण्या करणाऱ्या मशिनचे. ज्या वैद्यकीय चाचण्या घेण्याकरिता हजारो रुपये खर्च करावे लागतात आणि कित्येक तासाचा कालावधी खर्च करावा लागतो. त्या सर्व चाचण्या काही मिनीटीच्या काळात करुन देण्याची क्षमता असलेल्या या अत्याधुनिक मशीनचे प्रदेशाध्यक्षांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या मशिनची माहिती ऐकून स्वत:ची तपासणी करुन घेण्याची इच्छा श्री. चव्हाण यांनी व्यक्त केली. त्यांनी या मशिनच्या सहाय्याने स्वत:च्या चाचण्या करुन घेतल्या यावरुन त्यांना या ठिकाणी चालत असलेल्या वैद्यकीय शिबीराची कल्पना आली. त्यानंतर संपूर्ण दिवसात १ हजारांच्यावर लोकांची वैद्यकीय चाचणी या दिवशी या मशीनच्या माध्यमातून करण्यात आली. त्यानंतर श्री. चव्हाण यांनी वैद्यकीय




शिबीरामध्ये आलेल्या प्रत्येक स्टॉलवर जावून माहिती जाणून घेतली. कित्येक गरजू लोकांच्या डोळ्यांची तपासणी करुन त्यांना मोफत चष्म्याचे वाटप यावेळी करण्यात आले. त्यानंतर त्यांची पावले वळली ती गरजू विद्यार्थ्यांना करण्यात येणाऱ्या साहित्य वाटपाकडे.

### गरजू विद्यार्थ्यांना सायकल, हेल्मेट आणि छत्री वाटपाचा कार्यक्रम

या जनसंपर्क कार्यालयामार्फत गरजू विद्यार्थ्यांना सायकल, हेल्मेट आणि छत्री वाटप कार्यक्रम होता. या कार्यक्रमाचे पाहुणे प्रदेशाध्यक्ष असतील असे कोणाच्याही ध्यानीमनी नव्हते. त्यांनी सहजतेने या कार्यालयास भेट दिली होती. प्रदेशाध्यक्षच कार्यालयात आल्यामुळे त्यांच्याच हस्ते सायकल वाटपाचा कार्यक्रम सुरु झाला. यावेळी नागपूरच्या दक्षिण-पश्चिम मतदारसंघातील जवळजवळ १५४ पेक्षाही अधिक गरजू विद्यार्थ्यांना श्री. चव्हाण यांच्या हस्ते सायकलचे वाटप करण्यात आले. सायकल वाटपाचा कार्यक्रम संपताच यावेळी जमलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून प्रदेशाध्यक्ष चव्हाण आपल्या नियोजित कार्यक्रमाकरिता वर्धा येथे रवाना झाले.

प्रदेशाध्यक्ष निघून गेल्यानंतर देवेंद्रजींच्या जनसंपर्क कार्यालयाद्वारे देवेंद्रजींच्या ५५ व्या वाढदिवसनिमित्ताने आयोजित करण्यात आलेले इतर कार्यक्रम सुरु राहीले. नंतरच्या काळात या कार्यक्रमात नागपूरच्या दक्षिण-पश्चिम मतदारसंघातील अनेक गरजू २ हजारपेक्षाही अधिक लोकांना हेल्मेट व छत्रीचे वाटप करण्यात आले.

### संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन

देवेद्रजींच्या ५५ व्या वाढदिवासानिमित्ताने त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमापैकी दुसरा महत्वाचा कार्यक्रम होता तो संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करण्याचा. हा कार्यक्रम प्रदेशाध्यक्ष श्री.चव्हाण यांच्या उपस्थितीमध्येच पार पडला. या कार्यक्रमाकरिता १ हजारांच्यावर कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यकर्त्यांनी सामूहिकरित्या भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन केले. गंभीर आवाजामध्ये सुरु असलेले हे वाचन वातावरणाला प्रफुल्लित करीत होते. वरील सर्व कार्यक्रमाची धावपळ सुरु असतांना त्यानंतरचा कार्यक्रम सुरु झाला तो ३ वाजता. यावेळी समाजाचे प्रबोधन करणाऱ्या भजनी मंडळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

### प्रबोधनकार भजनी मंडळाचा कार्यक्रम

देवेंद्रजींच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्ताने आयोजित करण्यात आलेले विविध कार्यक्रम संपल्यानंतर शेवटी भजनी मंडळीच्या प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने नागपूर आणि नागपूर बाहेरील जवळजवळ ५५ गटाच्या भजनी मंडळांनी स्वयंप्रेरणेने या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. देवेंद्रजींच्या जनसंपर्क कार्यालयासमोरील परिसरामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बसायला जागा नसताना सुध्दा दाटीवाटीने उभे राहून १ हजारापेक्षाही अधिक श्रोते या विविधांगी भावामध्ये रसमय झालेल्या भजनाच्या कार्यक्रमाचा मन लावून आस्वाद घेत होते. अशाप्रकारे देवेंद्रजींच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची सांगता झाली.

■ अरुण कणेर

# अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ : युवकांच्या स्वावलंबनाचा ध्यास




> महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील बेरोजगार युवकांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासन अनेक योजना राबवत आहे. त्यामध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ ही एक महत्त्वाची संस्था ठरते. रोजगार निर्मितीची धडपड करणाऱ्या युवकांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ दिशा दाखवणारी वाट आहे. शासनाने आखून दिलेला हा महामार्ग युवक स्वावलंबी सक्षमीकरणासाठी मोलाचा ठरत आहे.

**अण्णासाहेब** पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना १९९८ मध्ये झाली. राज्यात आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या समाजाचा सामाजिक विकास करणे, विशेष करून या समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांकरिता रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याकरिता हे महामंडळ स्थापन करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन २०१८ मध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ पुनर्जीवित केले. मराठा समाजातील युवकांना उद्योजक करण्यासाठी या मंडळामार्फत विविध योजना जाहीर केल्या. महामंडळाकरिता शासनाने जाहीर केलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी होण्याकरिता नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांची महामंडळाच्या अध्यक्षपदी नेमणूक केली.

### महामंडळाच्या योजनांची माहिती

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना** (IR-1) –

या योजनेची मर्यादा रु.१० लाखाहून रु. १५ लाखापर्यंत




वाढविण्यात आलेली असून, महामंडळामार्फत रु. ४.५ लाखाच्या व्याज मर्यादेत परतावा करण्यात येतो. हा व्याज परतावा कालावधी जास्तीत जास्त ७ वर्ष व व्याजाचा दर जास्तीत-जास्त द.सा.द.शे. १२ टक्के असेल. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांनी बँकेमार्फत कर्ज घेतलेले असावे व ते फक्त व्यावसायिक तथा उद्योगाच्या दृष्टीने मंजूर झालेले असावे. दिनांक २० मे, २०२२ पूर्वीच्या L.O.I. धारकांना नियमानुसार रु. १० लाखाच्या मर्यादेतील व्याज परतावा करण्यात येणार असून त्याकरिता रु. ३ लाखाची मर्यादा असेल.

### गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना (IR-2) –

या योजनेअंतर्गत किमान दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्तींच्या गटाने एकत्र येऊन, दोन व्यक्तींसाठी कमाल रू. २५ लाखाच्या मर्यादेवर, तीन व्यक्तींसाठी रु. ३५ लाखाच्या मर्यादेवर, चार व्यक्तींसाठी रु. ४५ लाखाच्या मर्यादेवर व पाच व पाच पेक्षा अधिक व्यक्ती असल्यास रु. ५० लाखापर्यंतच्या व्यवसाय / उद्योग कर्जावर ५ वर्षापर्यत अथवा कर्ज कालावधी यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त १२ टक्के व्याज किंवा रु. १५ लाखाच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हफ्ते भरल्यास, हफ्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम गटाच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल.

या योजनेमध्ये FPO गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरिता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल.

सांगली जिल्ह्यात आत्तापर्यंत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत एकूण ११ हजार ४७३ एलओआय प्राप्त लाभार्थींपैकी ८ हजार ८३६ लाभार्थींना बँक कर्ज मंजूरी देऊन एकूण ८६१ कोटी २५ लाख रूपये कर्ज वितरीत करण्यात आले आहेत. यामध्ये महामंडळाकडून ८ हजार ४७७ लाभार्थ्यांना एकूण ८३ कोटी २१ लाख रूपये व्याज परतावा रक्कम देण्यात आली.

सांगली जिल्ह्यात आतापर्यंत गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत एकूण ३३९ एलओआय प्राप्त लाभार्थींपैकी २०५ लाभार्थींना बँक कर्ज मंजुरी देऊन एकूण ४९ कोटी ५४ लाख रूपये कर्ज वितरीत करण्यात आले. यामध्ये महामंडळाकडून २०१ लाभार्थींना एकूण ६ कोटी ८१ लाख रूपये व्याज परतावा रक्कम देण्यात आली.

महामंडळाच्या योजनांची संपूर्ण यंत्रणा व कार्यपद्धती ही ऑनलाईन असून पूर्णपणे पारदर्शक आहे. सदर योजना ही लाभार्थीभिमुख असून लाभार्थी जोपर्यंत सर्व माहिती वेब प्रणालीवर (https://udyog.mahaswayam.gov.in) अपलोड करीत नाही, तोपर्यंत पुढील कार्यवाही केली जात नाही.

### महामंडळाच्या योजनांकरिता सामाईक अटी व शर्ती

उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे. या योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गाकरिता तथा ज्या प्रवर्गाकरिता स्वतंत्र महामंडळ अस्तित्त्वात नाही, अशांकरिता आहेत. योजनेकरिताची वयोमर्यादेची अट स्त्री-पुरुषांकरिता कमाल ६० वर्षे असेल. लाभार्थीचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखाच्या आत असावे. त्यासाठी रू. ८ लाखाच्या मर्यादेत असल्याचे तहसिलदाराचे प्रमाणपत्र किंवा वैयक्तिक I. T. R. (पती व पत्नीचे) सादर करावे लागेल. लाभार्थीने महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक/कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य असेल. दिव्यांग व्यक्तिला योजनेअंतर्गत लाभ घ्यावयाचा असल्यास तो मानसिकदृष्ट्या सक्षम असावा. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) मध्ये कमाल वयोमर्यादेचे बंधन नसेल. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) अंतर्गत (i) भागीदारी संस्था (ii) सहकारी संस्था (iii) बचत गट, (iv) एल.एल.पी. (v) कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट/संस्था लाभास पात्र असतील. महामंडळाच्या योजनांतर्गत फक्त व्यवसाय/उद्योगाकरिता घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येईल व या योजनांची अंमलबजावणी शासन निर्णयाप्रमाणे तंतोतंत करण्यात येईल.




## या योजनांचा लाभ घेण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबण्यात येते

**पात्रता प्रमाणपत्र** (LOI) **करिता महत्त्वाची कागदपत्रे :** आधार कार्ड : (अपडेटेड मोबाईल क्रमांक व स्वतःच्या ई-मेल आयडी सह), रहिवासी पुरावा : (रहिवासी दाखला / लाईट बिल / रेशनकार्ड / गॅस बिल / बँक पास बुक), उत्पन्नाचा पुरावा : (उत्पन्नाचा दाखला / आयटी रिटर्न (जर लग्न झाले असल्यास नवरा-बायकोचे व लग्न झाले नसल्यास स्वतःचे आयटी रिटर्न अनिवार्य), जातीचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला, एक पानी प्रकल्प अहवाल. (याचा नमुना वेब प्रणालीवर उपलब्ध आहे.)

(ब) पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त झाल्यानंतरच, LOI समवेत लाभार्थीने त्याला करावयाचा असलेल्या व्यवसायाचा /उद्योगाचा प्रकल्प अहवाल (आवश्यक ती सर्व कागदपत्रे) घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेमध्ये कर्ज प्रकरण दाखल करावे.

कर्ज मंजुरीची पूर्ण प्रक्रिया बँक त्यांच्या नियमानुसार करीत असते, यामध्ये महामंडळ कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप करीत नाही. कर्ज प्रकरण दाखल केल्यानंतर पोचपावती बँकेकडून घ्यावी.

बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर कर्ज मंजुरीबाबतची आवश्यक सर्व माहिती संबंधिताने वेब प्रणालीवर सादर करावी. (उदा. ज्या खात्यामध्ये व्याज परतावा हवा आहे, त्याचा तपशील, बँक कर्ज मंजुरी पत्र, बँकेमार्फत वितरीत करण्यात आलेल्या कर्जाचा पुरावा (बँक स्टेटमेंट), बँक EMI वेळापत्रक (त्यावर वसुलीचा दिनांक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा (बँक स्टेटमेंट सही व शिक्क्यानिशी)

(ड) त्यानंतर बँकेमध्ये पूर्ण ईएमआय हफ्ता विहित कालमर्यादेत भरल्यानंतरच महामंडळाच्या वेब प्रणालीवर ऑनलाईन क्लेम दाखल करावा. दाखल केलेला क्लेम अचूक असला तरच संबंधिताला व्याज परताव्याचा लाभ देता येईल. यामध्ये हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा म्हणून बँक स्टेटमेंट सही व शिक्क्यानिशी अपलोड करणे अनिवार्य असेल.

(इ) लाभार्थीने दाखल केलेल्या क्लेमची पडताळणी महामंडळामार्फत करण्यात येऊन लाभार्थ्यांस अनुज्ञेय असलेली व्याज परताव्याची रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात ऑनलाईन स्वरुपात वितरीत करण्यात येईल.

या योजनांच्या लाभाकरिता कोणत्याही सहकार्याची आवश्यकता असल्यास महामंडळाच्या जिल्हा समन्वयकांना संपर्क साधावा. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या योजना ही केवळ आर्थिक मदतीची साधने नसून युवकांना रोजगार निर्माते बनविण्याची प्रक्रिया आहे.

स्वावलंबन, उद्योगशीलता व ग्रामीण-शहरी विकासाचा सेतू म्हणून हे महामंडळ महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात युवकांना आत्मविश्वासाने पुढे जाण्यासाठी या योजना एक सक्षम मंच ठरत आहेत. ■

# मराठा समाजासाठी देवेंद्र फडणवीस सरकारने घेतलेल्या निर्णयांचा हजारो तरुणांना मिळाला फायदा

**मराठा समाजातील शेकडो विद्यार्थ्यांना मिळाली शिष्यवृत्ती**

**१. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ वैयक्तिक कर्जव्याज परतावा योजना**

■ एकूण लाभार्थी : १ लाख ४८ हजार

■ १४ हजार कोटींचे कर्ज १ हजार कोटी रुपये व्याज परतावा

**२. गट कर्ज व्याज परतावा योजना**

■ एकूण लाभार्थी : ५२६

■ व्याज परतावा : ९.१६ कोटी रुपये

**३. राजर्षि छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना**

■ २०१८-१९ : १०,२३४ विद्यार्थी/९० कोटी रुपये

■ २०१९-२० : १२,९०७ विद्यार्थी/११८ कोटी रुपये

■ २०२०-२१ : १५,८९० विद्यार्थी/१४९ कोटी रुपये

■ २०२१-२२ : १९,००९ विद्यार्थी/१४१ कोटी रुपये

**४. सारथी राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती योजना**

■ यूपीएससीत: ५१ उमेदवार यशस्वी (१२ आयएएस, १८ आयपीएस, ८ आयआरएस, १ आयएफएस, १२ इतर सेवा) एमपीएससीत: ३०४ उमेदवार यशस्वी एकूण २१०९ विद्यार्थ्यांना ८७ कोटी रुपये

**५. महाराणी ताराराणी स्पर्धा परीक्षा**

■ ११,३९३ विद्यार्थ्यांना ४५ कोटी रुपये

**६. कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम**

■ कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास २७.३४६ विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरु सारथी विभागीय कार्यालये (छत्रपती शिवाजी महाराज संकुल)

■ एकूण ८ विभागात शासनाकडून विनामूल्य जमिनी सारथी पुणे

■ कार्यालय : ४२.७० कोटी/डिसेंबर २०२३



■ अखेरीस काम पूर्ण सारथी खारघर : ११९.३८ कोटी रुपये

■ सारथी उपकेंद्र, कोल्हापूर १७६.३८ कोटी रुपये

■ सारथी नाशिक: १५८.९९ कोटी रुपये

■ छत्रपती संभाजीनगर: १४०.२४ कोटी रुपये

■ लातूर: १७२.८६ कोटी रुपये नागपूर : २०४.६४ कोटी रुपये

असे एकूण : १०१५.९० कोटी रुपये : या प्रत्येक ठिकाणी ३०० विद्यार्थ्यांची अभ्यासिका/५०० मुले. (आणि ५०० मुलींचे वसतीगृह)

**७. श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी व इंडो-जर्मन टूलरूम प्रशिक्षण**

१४६ प्रशिक्षण पूर्ण/४६६ प्रशिक्षण सुरु ९ ते ११ साठी छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजना २३,२२४ विद्यार्थ्यांना ३१.२३ कोटी रुपये

**८. महाराजा सयाजीराव गायकवाड परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजना ४ जुलै २०२३ रोजी मंत्रिमंडळाची मान्यता/दरवर्षी ७५ विद्यार्थी/१२ ऑगस्ट २०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध एमएससाठी ६० लाख तर पीएचडीसाठी १.६० कोटी**

माझ्या समाजाच्या तरुणांसाठी देवेंद्रजी फडणवीस यांनी केलेली ही काम इतर कोणत्याही मराठा नेत्याने आमच्यासाठी केलेल्या कामापेक्षा अधिकच. म्हणूनच देवेंद्रजी कर्मयोगी मराठा आहेत. ■

# 'नांदेड- मुंबई वंदे भारत एक्सप्रेस' ने उघडले मराठवाड्याच्या समृद्धीचे द्वार



मराठवाड्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी शासन गतिमान दळणवळणावर भर देत आहे. 'वंदे भारत एक्सप्रेस' ने नांदेड, राजधानी मुंबईच्या अधिकजवळ आले असून यामुळे निश्चितच मराठवाड्याच्या समृद्धीचे द्वार उघडले आहे, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नांदेड–मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा नांदेड रेल्वे स्थानकावरून शुभारंभ करण्यात आला. या रेल्वे गाडीचा मुख्यमंत्री देवेंद्र





फडणवीस यांनी मंत्रालयातून ऑनलाइन पद्धतीने हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. मंत्रालयात आयोजित कार्यक्रमाला सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर–साकोरे, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, धर्मवीर मीना व इतर अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय रेल्वे कात टाकत आहे. प्रगत देशांसारखे आरामदायक सुविधा असलेली भारतात निर्मित वंदे भारत रेल्वे ही त्याचेच प्रतीक आहे. मुंबई ते नांदेड हे ६१० किलोमीटरचे अंतर ९.३० तासात पूर्ण होणार आहे. पूर्वी जालनापर्यंत धावणारी वंदे भारत आता हुजूर साहिब नांदेडपर्यंत जात आहे. या रेल्वे गाडीची क्षमता ५०० वरून १४४० पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच गाडीचे डब्बे ८ वरून २० पर्यंत वाढवण्यात आले आहे. नांदेड हे शिख धर्मियांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांना, प्रवाशांना वेगवान व आरामदायी प्रवासाची अनुभूती 'वंदे भारत' एक्सप्रेसच्या माध्यमातून होणार आहे. वंदे भारत एक्सप्रेसच्या सुखकर, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी मराठवाड्यातील जनतेचे अभिनंदनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले. नांदेड येथे आयोजित कार्यक्रमप्रसंगी खा. अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आ.विक्रम काळे, दक्षिण मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक सत्यप्रकाश, मंडल रेल्वे व्यवस्थापक, नांदेड मंडल, प्रदीप कामले, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, नांदेड परिशेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार व इतर अधिकारी उपस्थित होते.

**नांदेड–मुंबई वंदे भारत एक्सप्रेस विषयी थोडेसे**

■ मराठवाड्यातील नांदेडला राज्याची राजधानी मुंबईशी जोडणारी पहिली वंदे भारत एक्सप्रेस.

■ नांदेड ते मुंबई असा ६१० कि. मी. चा प्रवास फक्त ०९ तास ३० मिनिटांत पूर्ण, इतर गाड्यांच्या तुलनेत प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी.

■ महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटनस्थळे व धार्मिक स्थळांदरम्यान वेगवान, सुरक्षित आणि आरामदायी वातानुकूलित दिवस अवधी प्रवासाची सुविधा.

■ हुजूर साहिब नांदेडहून बुधवार व मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून गुरुवार वगळता आठवड्यातून सहा दिवस गाडीची सुविधा प्रवाशांना मिळणार आहे.

■ नियमित प्रवास करणारे प्रवासी, भाविक, अधिकारी व व्यापारी यांच्यासाठी ही गाडी अत्यंत उपयुक्त.

■ पर्यटनस्थळे व तीर्थक्षेत्रांना जाणाऱ्या प्रवाशांसाठी प्रवास आणखी सोपा. ■

# जालना ग्रामीण जिल्हा कार्यकारिणी जाहीर

जालना ग्रामीण जिल्हा कार्यकारिणी जिल्हाध्यक्ष आ. नारायणराव कुचे यांनी जाहीर केली आहे.

**नूतन कार्यकारणी पुढील प्रमाणे**

जिल्हा उपाध्यक्षपदी भाऊसाहेब जाधव, अवधुत रामभाऊ खडके, आशा माळी, परिक्षीत शिंदे, गणेश खवणे, शिवाजी बोबडे, पदमाकर जऱ्हाड, शंकर लहामंगे, जिजाबाई जाधव, वीरेंद्र धोका तर जिल्हा सरचिटणीसपदी अनिल कोलते, तारामती खरात, गणेश ठाले, रमेश भापकर, गोविंद ढेंबरे व जिल्हा चिटणीसपदी सचिन जाधव, हरिश्चंद्र शिंदे, राजेश चव्हाण, एकनाथ मोरे, शोभा देशमुख, गंगासागर पिंगळे, ज्योती ठाकुर, द्वारका मेहेत्रे, राजु साळवे, प्रकाश ढवळे व जिल्हा कोषाध्यक्षपदी कल्याण काळे व जिल्हा प्रसिध्दीप्रमुखपदी बाबासाहेब कोलते व कार्यालयप्रमुखपदी एकनाथ कानुले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी राजेंद्र देशमुख, मुकेश चिने, गणेश फुके, शिवाजीराव थोटे, तुकाराम जाधव, महेश जोशी, विलास आडगावकर, मधुकर गाढे, साहेबराव कानडजे, संतोष लोखंडे, गजानन घाडगे, अरुणराव अवकाळे, गोविंदराव पंडीत, सुधीर पाटील, भिमराव भुंजग, रमेश जऱ्हाड, राम शिंदे, सुपडसिंग जगरवाल, भिमराव जावळे, शिवाजी शिंदे, राजेंद्र फटाले, गणेश चव्हाण, गौरखनाथ खैरे आदींची निवड करण्यात आली. ■

# पाथर्डी मंडल युवा मोर्चा कार्यकारिणी घोषित

**अध्यक्ष** – विकास एखंडे, **उपाध्यक्ष** – निखील आंबेकर, तन्मय आव्हाड, **सरचिटणीस** – दिपक जोशी, आकाश देवाडिगा, **चिटणीस** – सत्यजित ढोमसे, आकाश खताळे **कोषाध्यक्ष** – दिपक बरडिया, **सोशल मीडिया प्रमुख** – तेजस वानखेडे, **प्रसिध्दी प्रमुख** – राहुल दोंदे, **विद्यार्थी संयोजक** – रितेश भालेराव, **उदयोग विभाग संयोजक** – स्वप्निल मेमाणे, **सदस्य** – आकाश रसाळ, प्रविण कोंबडे, वैभव वाडेकर, आकाश आहेर, महेश अरोटे, मनिष कडवे, आशिष पाटील, ऋतुराज वाघ. ■

# राज्य शासनाच्या किमान वेतन सल्लागार मंडळाच्या अध्यक्षपदी गणेश ताठे यांची नियुक्ती



**महाराष्ट्र** शासनातर्फे किमान वेतन अधिनियम, १९४८ कलम ७, कलम ९ आणि महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ मधील कलम ४ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाची पुर्नरचना नुकतीच करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) श्री. गणेश लक्ष्मणराव ताठे यांची नियुक्ती करण्यात आली. श्री. गणेश ताठे यांनी भारतीय जनता पार्टीचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून ज्यांनी सन १९९० पासून काम सुरू केलं, स्वतःच्या पक्षाचं सरकार नसताना देखील अनेक वर्षे मनस्वीपणे काम करीत पक्षाचं नाव झेंडा वाड्या वस्त्यांपर्यंत पोहोचवलं. कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना देखील या सामान्य कार्यकर्त्याला पक्षाने दोन वेळा भाजपा कामगार आघाडी प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करायची संधी दिली. त्या संधीच श्री. ताठे यांनी सोनं केलं. सातत्याने लोकांच्या करिता, कामगारांकरिता शासन दरबारी पाठपुरावा केला. केंद्रीय कामगार कायद्यामध्ये कामगार हिताचे बदल करण्यात पुढाकार, कोविड काळात मृत्यू झालेल्या कामगारांच्या निराधार कुटुंबांना ज्यांनी योग्य न्याय मिळवून दिला. श्री. ताठे यांनी शिरूर तालुक्यातील कारेगाव शाखा युवा मोर्चा अध्यक्ष म्हणून राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली. तालुका युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिल्यानंतर कामगार मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. पुढे कामगार मोर्चा प्रदेश सचिव, प्रदेश सरचिटणीस म्हणून त्यांनी काम केले. कामगार मोर्चाचे २ वेळा प्रदेश अध्यक्ष म्हणून काम केलेल्या श्री. ताठे यांची कामगार मोर्चाचे प्रभारी म्हणून नियुक्ती झाली आहे. ■





छत्रपती संभाजीनगर– कावड यात्रा– प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर यांनी आयोजित केलेल्या या यात्रेचा प्रारंभ ह.भ.प. महंत श्री रामगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. विविध संघटनांचे १० हजारांहून अधिक कार्यकर्ते या यात्रेत सहभागी झाले होते.




नांदेड– आरोग्य शिबिर– उपस्थिती– महानगराध्यक्ष आ अमरनाथ राजूरकर, अध्यक्ष प्रविण साले, चैतन्य देशमुख, महेश खोमणे, सरचिटणीस विजय येवनकर, विजय गंभीरे, अक्षय अमिलकंठवार, अल्पसंख्याक मराठवाडा प्रमुख गुरूदीप सिंग सिध्दु, अमरजीत सिंग कुंजीवाले, रणजीत सिंग गिल, सुखविंदर सिंग हुंदल, गुरप्रीत सिंग सोखी, हरप्रीत सिंग आदी.



नाशिक– प्रा.डॉ. प्रियनाथ घोष यांची नाशिक महानगर जिल्हा बंगाली सेलच्या संयोजकपदी निवड– उपस्थिती– महानगर जिल्हाध्यक्ष सुनील केदार, नाना शिलेदार, गोविंद बोरसे, समीरण मुखर्जी, अमिताभ चक्रवर्ती, मृणाल हाजरा आदी.




पालघर– उबाठा नेते उपेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली उबाठा गटातील शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, वनमंत्री व पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



शहापूर– उबाठा सेनेच्या आदिवासी आघाडीचे अध्यक्ष व शिरोळचे सरपंच संतोष आरे यांच्यासह असंख्य पदाधिकारी व आदिवासी कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, पांडुरंग बरोरा, जिल्हा ग्रामीण अध्यक्ष जितेंद्र डाकी, भास्कर जाधव, गणेश राऊत, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



तुळजापूर– राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे जिल्हा उपाध्यक्ष कुणाल निंबाळकर व कमल चव्हाण यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती – आ. राणाजगजितसिंह पाटील, नितीन काळे आदी.



पालघर– जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम, माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते नंदकुमार पाटील यांचा समर्थकांसह भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष भरत राजपूत, बाबाजी कारोळ, विवेक कलमाडा आदी.



चंद्रपूर– वरोरा भद्रावतीचे माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, उबाठा गटाच्या अनेक माजी नगरसेवकांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, ज्येष्ठ नेते हंसराज अहीर, वनमंत्री व पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, आ. करण देवतळे, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस ॲड.माधवी नाईक, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



कल्याण–डोंबिवली– काँग्रेसचे ज्येष्ठ माजी नगरसेवक नंदू म्हात्रे आदी माजी नगरसेवकांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, वनमंत्री गणेश नाईक, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस ॲड. माधवी नाईक, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, माजी मंत्री व ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, अनुसूचित जाती मोर्चा सरचिटणीस शशिकांत कांबळे, कल्याण ग्रामीण मंडल अध्यक्ष मंदार टावरे, राहुल दामले, मंदार हळबे आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**

**कार्यालय मंत्री :**

भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई–२०
दूरध्वनी : ०२२–२२०२२०५०, फॅक्स : ०२२–२२८५२३०५
ई मेल– bjpmaha.manogat@gmail.com